सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, ०२ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६१ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## मनोज जरांगे पाटील यांची राजकोट येथे भेट

सिंधुदुर्ग, १ सप्टेंबर - छत्रपतींचा पुतळा कोसळण्याच्या घटनेचे सत्ताधारी आणि विरोधकांनी राजकारण सुरू केले आहे. हा प्रकार महाराष्ट्रासाठी दुर्दैवी आहे. अशा घटनेचे राजकारण करणाऱ्या दोन्ही बाजूच्या पक्षांना महाराष्ट्राची जनता घरी बसविणार आहे. यातून कुणाचीही सुटका नाही. असा इशारा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी आज येथे दिला. पुतळा दुर्घटनेतील दोषी पळून कसे जाऊ शकतात. त्यांना शोधून योग्य तो तपास व्हायला हवा. दोषी व्यक्ती कोणत्याही मंत्र्यांचा मित्र असू दे, तो पंतप्रधानांचा जरी मित्र असला तरी त्याला पकडून जेलमध्ये सडवले पाहिजे असेही जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले.

# विधानसभेसाठी ईव्हीएम मतदान यंत्रे तयार!

नांदेड : राज्यातील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या मतदार यंत्रांची तपासणी करून ते मतदानासाठी सज्ज करण्यात आले आहेत.

दिनांक १ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट या दरम्यान मतदान यंत्रे तयार करण्याचे कामकाज महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे गोदाम ,चखऊ, ढवळे कॉर्नर नांदेड येथील जिल्हा वेअर हाऊस येथे चालू होते. सदरील कामकाज पूर्ण करण्यात आले असून आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने इण ७०१०, उण



३९२२, ततझ-ढ ४२३१ इतके मतदान यंत्रे जिल्ह्यातील ९ विधानसभा मतदारसंघासाठी तयार करण्यात आली आहेत.

सदरील कामकाज जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने व त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचारी यांनी पार पाडले. त्यामध्ये नायब तहसीलदार भोसीकर मुखेड, नायब तहसीलदार विजयकुमार पोटे, भोकर नायब तहसीलदार सतीश कुलकर्णी, नायगाव नायब तहसीलदार बोलेलो त्याचप्रमाणे इतर विभागाचे २० ते २५ कर्मचारी व बेल कंपनीचे १६ इंजिनिअर आणि दररोज ३० ते ४० हमाल यांच्या सहकार्याने सदर मतदान यंत्रे तयार करण्याचे एफएलसीचे कामकाज यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आलेले आहे. सदरची मतदान यंत्रे आगामी विधानसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आली आहेत.

# आजपासून महागले सिलेंडरचे दर

मुंबई: आजपासून सप्टेंबर महिन्याची सुरूवात झाली आहे. १ सप्टेंबर २०२४ला सकाळी-सकाळी महागाईला जोरदार झटका आहे. ऑगस्टनंतर पुन्हा एकदा सप्टेंबरमध्ये ऑईल मार्केटिंग कंपनीमध्ये वाढ झाली आहे. दरम्यान यावेळेस १९ किलोग्रॅमच्या कमर्शियल



एलपीजी सिलेंडरच्या दरात वाढ झाली आहे. तर १४ किलो घरगुती गॅस सिलेंडरचे दर जैसे थेच आहे. रविवारी पहिल्या तारखेपासून दिल्लीमध्ये कमर्शियल गॅसच्या दरात ३९ रूपयांची वाढ झाली आहे.

दिल्लीपासून मुंबईपर्यंत वाढले इतके दर

IOCL च्या वेबसाईटच्या माहितीनुसार दिल्लीपासून ते मुंबईपर्यंत गॅस सिलेंडर १ सप्टेंबर २०२४ ला सकाळी ६ वाजल्यापासून लागू करण्यात आले आहेत. ताज्या बदलानुसार आता राजधानी दिल्लीत १९ किलो एलपीजी सिलेंडरचे दर १६५२.५० रूपयांनी वाढून १६९१.५० रूपये झाले आहे. कोलकाताबद्दल बोलायचे झाल्यास कमर्शियल गॅस सिलेंडरचे दर १७६४.५० रूपयांनी वाढून आता १८०२.५० रूपये झाले आहे. येथे ३८ रूपयांनी महाग झाले आहेत.

इतर शहरांबद्दल बोलायचे झाल्यास मुंबईत १९ किलोच्या या सिलेंडरची किंमत १ सप्टेंबरपासून वाढून १६४४ रूपये झाले आहे. तर ऑगस्टमध्ये ७ रूपये वाढून १६०५ रूपये झाली होती. या वाढीत सलग दसऱ्या महिन्यात वाढ केली आहे. याशिवाय चेन्नईमध्ये एलपीजी सिलेंडरचे दर वाढले आहेत.

# अर्धापूर तालुक्यात पावसाचा तडाखा शेतीला फटका

## नदी-नाले फुल्ल; अनेक गावांचा संपर्क तुटला

अर्धापूर : तालुक्यातील दाभड, मालेगाव आणि अर्धापूर या तीनही मंडळात तालुक्यातील परिसरात शनिवारी रात्री झालेल्या पावसाने पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सोयाबीन, कपुस, हाळद तुर आदी पीकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर अर्धापूर मंडळात ७२ टक्के पाऊस झाला आहे.

अर्धापूर तालुक्यात मृगनक्षत्रा नंतर शेतकऱ्यांना चांगल्या पावसाची प्रतीक्षा होती. रिमझिम पावसावर पिके चांगली आली आहेत. परंतु, शनिवारी रात्री ढगफुटीसारख्या पावसाला सुरुवात झाली. या पावसामुळे कापूस, सोयाबीन चे नुकसान झाले तर तुर पिक आडवी झाली आहेत. यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. झालेल्या नुकसानीचे प्रशासनाने पंचनामे करून आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

तालुक्यातील अर्धापूर मंडळात सर्वाधिक ७२ मिलिमीटर पाऊस झाला आहे. दाभड मंडळात ४० मिलिमीटर तर मालेगाव मंडळात ३८ मिलिमीटर पाऊस पडला असून रविवारी ही मुसळधार पाऊस सुरूच होता नदी नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आल्याने छोट्या-मोठ्या नाल्यावरील अनेक रस्त्यावरून पाणी वाहू लागल्याने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

नदी-नाले फुल्ल; अनेक गावांचा संपर्क तुटला

शेलगाव येथील नदीच्या पुलावरून पाणी वाहत असल्याने शेलगाव येथील ग्रामस्थांचा संपर्क तुटला आहे. लोणी येथील (लोणारी नदी) नाल्याला पुर आल्याने परिसरातील शेतीचे नुकसान होते आहे. निमगाव येथे उगम पावलेला नाला पार्डी, शेनी आदी गावातुन जातो क्षमतेपेक्षा जास्त पाणी आल्याने पात्र सोडून वाहत आहे. काठावरील शेतीचे मोठे नुकसान होत आहे.

# महिलांना कौशल्य आधारित संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे : चंद्रकांत पाटील

पुणे, १ सप्टेंबर - कुटुंबांच्या आर्थिक गरजांसाठी युवकांसोबतच महिलांसाठी कौशल्य आधारित संधी निर्माण करणे गरजेचे आहे. घरातली सर्व जबाबदारी सांभाळत त्यांच्यासाठी कौशल्य आधारित रोजगाराच्या संधी घरीच कशा उपलब्ध होतील हे पाहिले पाहिजे. कौशल्यांमुळे चांगले उत्पन्न मिळून आर्थिक प्रगती होते. संपूर्ण जगात कौशल्याधारीत मनुष्यबळाला मोठी संधी निर्माण झाली असून युवकांनी या संधीचा लाभ घ्यावा. पारंपरिक शिक्षण घेतलेल्यांनी कौशल्यांची जोड दिल्यास या संधी मिळणार आहे, असे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले.



शालेय शिक्षण मंत्री केसरकर म्हणाले, भारताच्या तुलनेत परदेशात आर्थिक प्राप्ती जास्त आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने जर्मनी देशातील बाडेन वुटेनबर्ग या राज्याशी सामंजस्य करार करुन युवकांसाठी चांगलीं संधी निर्माण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. तरुण सुखी झाला तर कुटुंब सुखी होईल. युवक भारताची शक्ती आहे. पहिल्या टप्प्यात दहा हजार युवकांना प्रशिक्षित करुन जर्मनीला पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी जर्मन भाषा शिकणे गरजेचे आहे. यापूर्वी इंग्रजीतून जर्मन भाषा शिकविण्यात येत होती मात्र आता मराठीतून जर्मन भाषा शिकवण्याचा प्रयोग सुरू करण्यात येत आहे, असेही ते म्हणाले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, शिक्षणामुळे रोजगार संधी निर्माण होते. स्वप्न साकार करण्यासाठी युवकांनी सकारात्मक रहावे. परदेशात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. त्यासाठी येथील युवकांनी विविध देशांतील भाषा शिकायला हव्यात, कौशल्ये प्राप्त केली पाहिजेत. यासाठी स्वयंसेवी संस्था, तसेच खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती यांचा कृती दल तयार करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. युवकांनी परदेशात विविध पदांवर जाण्यासाठी जिद्द आणि चिकाटी ठेवावी, असे त्या म्हणाल्या.

जिल्हाधिकारी डॉ. दिवसे म्हणाले, आज रोजगार व स्वयंरोजगार हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पुणे विद्येचे माहेरघर, आयटी हब आहे. आज रोजगार मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे मात्र युवकांनी स्वत:ला कौशल्याने सक्षम बनवत या संधींचा लाभ घेणे आवश्यक आहे. राज्य शासनाच्या मुख्यमंत्री युवा दूत योजनेचा युवकांनी लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

राजेश पांडे यांनी प्रास्ताविकात सांगितले, स्थानिक मुलांना रोजगार व स्वयंरोजगार मिळावा या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला आहे.

या मेळाव्यात १३१ कंपन्या, आस्थापनांनी सहभाग नोंदविला असून १८ हजार २५७ रिक्त जागा भरण्यासाठी मागणी कळविली होती. सुमारे ९ हजार ५०० गरजूंनी मेळाव्यात विविध स्टॉल्सला भेट दिली तर ७ हजार २०० जणांनी नोकरीसाठी मुलाखती दिल्या.

# छत्तीसगडमधील काँग्रेस नेत्याचे कुटुंबासह विषप्राशन, चौघांचा मृत्यू

चांपा,१ सप्टेंबर : छत्तीसगडमधील चांपा जिल्ह्यात काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्याने पत्नी आणि दोन मुलांसमवेत विष प्राशन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. पंचराम यादव (६५), त्यांच्या पत्नी नांदणी यादव (५५), आणि दोन मुलांपैकी सूरज यादव (२७) आणि निरज यादव (३२) यांनी विष घेतले. सर्व चार जणांना प्रथम जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण प्रकृती गंभीर असल्याने त्यांना बिलासपूरमधील सिम्स रुग्णालयात हलवण्यात आले. उपचारादरम्यान, ३१ ऑगस्ट रोजी या चौघांचा मृत्यू झाला.



पंचराम यादव, कॉंट्रॅक्टर होते, त्यांनी दोन बँकांकडून ४० लाखांचे लोन घेतले होते आणि त्यांना हृदयाच्या आजाराचा त्रास होता. त्यांची पत्नी कर्करोगाशी झुंज देत होती, तर एक मुलगा खासगी कंपनीत काम करत होता आणि दुसरा कॉंट्रॅक्टर्सच्या कामात होता.

मिळालेलेया माहितीनुसार, त्यांनी घराच्या दोन्ही गेटांना कुलुप लावले आणि तिसऱ्या गेटवरून आतून कुलुप लावून आत्महत्या केली. घराच्या बाहेरून आवाज देऊनही दरवाजा उघडला जात नसल्यामुळे, त्यांच्या घरी आलेल्या एका मुलीला संशय आला, तिने स्थानिकांना माहिती दिली. त्यानंतरच या प्रकाराचा उलगडा झाला.

पोलिसांनी घर सील केले असून चौकशी सुरू केली आहे. आत्महत्येच्या कारणांवर अजून तपास सुरू आहे, पण आर्थिक तणाव आणि कुटुंबातील आजार याला कारणीभूत असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

## सातपुर परिसरात शॉक लागून युवकाचा मृत्यू

नाशिक , १ सप्टेंबर, - नाशिक शहरातील सातपूर परिसरामध्ये बांधकामाला पाणी मारत असताना विजेचा शॉक लागून एका २० वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना सातपूर पोलीस स्टेशन हद्दीत श्रमिक नगर सातमाऊली चौक परिसरात आज सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास घडली. मंगेश राणेअसे मृतक युवकाचे नाव आहे. माहितीनुसार मयत मंगेश याच्या घराचे बांधकाम चालु होते.

# हा महाराष्ट्रासह जनतेचा अपमान, शाहु महाराज यांची जोरदार टिका

मुंबई, १ सप्टेंबर : मुंबईतील हुतात्मा चौकात महाविकास आघाडीने महायुती सरकारविरोधात 'जोडे मारो' आंदोलन केले. या आंदोलनात कोल्हापूरचे खासदार शाहु महाराज यांनी महायुतीच्या कारभारावर तीव्र टीका केली. मालवणमधील घटनेवर भाष्य करत शाहु महाराज म्हणाले, हा महाराष्ट्राचा अपमान आहे. याचा परिणाम भारताच्या बाहेरही झाला आहे, आणि तेथेही संताप व्यक्त केला जात आहे.

शाहु महाराजांनी सरकारवर आरोप केला की ते महाराष्ट्राची प्रतिष्ठा आणि शिवाजी महाराजांचा मान राखण्यात अपयशी ठरले आहेत. त्यांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आणि पुतळा बसवणाऱ्यांचा निषेध केला. महाराष्ट्रातील लोक याविरोधात संतप्त आहेत आणि या अपमानाचे निवारण करण्यात यावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनात सहभागी झालेल्या लोकांनी महाराष्ट्राच्या मानाचा आदर राखण्यासाठी सरकारकडे कठोर पावले उचलण्याची मागणी केली.

# नगर शहराची डेंग्यूमुक्तीकडे यशस्वी वाटचाल : मनपा आयुक्त यशवंत डांगे

## श्रमिकनगर भागात विषाणूजन्य आजार जनजागृती मोहीम



अहमदनगर : पावसाळ्यात उद्भवणारे विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी एक तास स्वच्छतेसाठी ही आठ आठवड्यांची मोहीम महानगरपालिकेने सुरू केली होती. त्यानुसार दर रविवारी एक तास आपला परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे यासाठी आवाहन करण्यात आले होते. त्या जनजागृती मोहीमेला अहमदनगर शहरातील सर्व भागातील नागरिकांकडून सहकार्य मिळाल्यामुळे विषाणूजन्य आजारांवर नियंत्रण मिळवण्यात यश येत असून नगर शहराची डेंग्यूमुक्तीकडे यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले. झिका, डेंग्यू आदी विषाणूजन्य आजार रोखण्यासाठी जनजागृती मोहिमेच्या सातव्या रविवारी सावेडी उपनगरातील श्रमिक नगर परिसरात जनजागृती व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. परिसरात गप्पी माशांचा प्रयोग करून डास उत्पत्तीची स्थाने नष्ट करण्यात आली. त्यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले की, या पावसाळ्यातील सात आठवडे पूर्ण झाले असून येत्या पुढील काळात विषाणूजन्य आजारांवर उपाययोजना व जनजागृती करण्यासाठी आणखी दक्षता घेणे आवश्यक आहे.

# अपघाताच्या निषेधार्थ पेट्रोल पंपावर गेलेल्या जमावर गुन्हा दाखल

## उदय पेट्रोल पंप बंद केल्याने व्यवस्थापकाने दिली फिर्याद

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०२ सप्टेंबर - तालुक्यातील नागद येथे दि.३० रोजी झालेल्या अपघातात महिला गतप्राण झाली होती त्या घटनेचे पडसाद नागद परिसरात उमटले होते



अपघाताची बातमी वाऱ्यासारखी पसरताच मोठा जमाव जमा झाल्याने नागद - बनोटी रस्त्यावर तीन तास वाहतूक होती,रस्त्यावर खड्डे असल्याने आणि रस्ता अरुंद असल्याने हा अपघात घडला आहे असा आरोप जमावाने करत आमदार उदयसिंग राजपूत यांच्या उदय पेट्रोलियम पंपावर जमाव चालून आला होता काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती, जमावाने पेट्रोल पंप बंद केला होता यावेळी पेट्रोल पंपावर असलेल्या कर्मचारी आणि जमावमध्ये बाचाबाची झाल्याची घटना घडली आहे


पेट्रोल पंप व्यवस्थापक दगडु दामु पाटील वय ४९ वर्षे रा.नागद ता.कन्नड यांनी कन्नड ग्रामीण पोलिस स्टेशन येथे जमावाच्या विरोधात फिर्याद दिली असून फिर्यादीमध्ये म्हटले आहे की,(१) हरिश मुमनावत रा.हनुमंतखेडा ता सोयगांव (२) दयाराम राठोड (३) संजय चव्हाण (४) विठ्ठल राठोड (५) राहुल राठोड (६) युवराज धर्मराज पवार सर्व रा नागदतांडा (७) रामराव ओंकार चव्हाण (८) मोतिलाल चव्हाण रा.बेलखेडा तांडा यांनी गैरकायद्याची मंडळी जमुन दि.३० रोजी नागद येथे झालेल्या अपघाताशी काहीही संबंध नसतांना नागद येथील उदय पेट्रोलपंपवर येवुन सामानाची नासधुस करुन फिर्यादीस शिवीगाळ करुन धक्काबुक्की केली व त्यांचे जवळील ६० ते ७० हजार रुपये गोंधळात कोणीतरी काढुन घेतले व जिवे ठार मारण्याच्या धमक्या दिल्या असे म्हटले आहे

अधिक तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक डॉ रामचंद्र पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अमोल जाधव हे करत आहे

# टीजेएसबी सहकारी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर निखिल नंदकुमार आरेकर यांची नियुक्ती

त.भा.वृत्तसेवा

सोलापूर, १ सप्टेंबर : देशातील नागरी सहकारी बँकात आघाडीवर असणाऱ्या बहुराज्जीय टीजेएसबी सहकारी बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी पदी निखिल नंदकुमार आरेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निखिल नंदकुमार आरेकर यांना एकतीस ( ३१) वर्षाचा नागरी सहकारी बँकिंगचा प्रदीर्घ अनुभव आहे.



निखिल नंदकुमार आरेकर यांनी वाणिज्य शाखेतील पदव्युत्तर शिक्षण घेतलेले आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ बँकर्स (खखइत्र) संस्थेकडून उ-खखइ ही पदवी घेतली आहे. बँकिंग मधील ब्रँच बँकिंग, रिटेल क्रेडिट, कॉर्पोरेट क्रेडिट, फॉरेक्स, एन.पी.ए. मॅनेजमेंट आणि बिझिनेस डेव्हलपमेंट यातील तज्ज्ञ अशी निखिल नंदकुमार आरेकर यांची ओळख आहे. डिसेंबर १९९३ रोजी टीजेएसबी सहकारी बँक लि.च्या सेवेत रुजू झाले होते. बँकेत विविध पदांवर यशस्वीपणे काम करून बँकेच्या व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या पदापर्यंत पोहोचले आहेत.

शालेय शिक्षण बेडेकर विद्यामंदिर आणि वाणिज्य शाखेचे पदवी शिक्षण ठाणा कॉलेज येथून पूर्ण केले आहे.

बँकिंग आणि अर्थकारणाचे अभ्यासक असलेले निखिल नंदकुमार आरेकर हे चांगले वाचक असून,साहित्य-संस्कृतीचे जाणकार आहेत.

व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून निखिल नंदकुमार आरेकर आपल्या कारकिर्दीत टीजेएसबी सहकारी बँकेच्या कामकाजाची गती वाढवून ग्राहक सेवेची तत्परता आणि अचूकता अधिक प्रभावी करतील, असा विश्वास बँकेच्या संचालक मंडळाने व्यक्त केला.

बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.सुब्बलक्ष्मी शिराली दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी निवृत्त झाल्या. सुब्बलक्ष्मी शिराली यांनी नवनियुक्त व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी निखिल नंदकुमार आरेकर यांना शुभेच्छा दिल्या.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## चौफेर

पाकिस्तानात सध्या विचित्र गोंधळाची व अशांततेची परिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांना जगातून कायमचे नष्ट करण्यासाठी अर्थात त्यांची हत्या करण्याच्या उन्मादाने प्रेरित झालेल्या हजारो धर्मांधांनी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात न्यायालयाच्या आवारात प्रवेश केला होता. आरोपीची ईशनिंदेच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्याच्या सरन्यायाधीशांच्या निर्णयामुळे हे धर्मांध जिहादी संतप्त झाले होते.

ज्या व्यक्तीची ईशनिंदेचा 'गुन्हा' केल्याच्या आरोपातून निर्दोष सुटका करण्यात आली ती व्यक्ती 'अहमदिया' समुदायाची आहे, त्यामुळे इस्लामिक कट्टरवाद्यांच्या दृष्टीने अशी व्यक्ती मुस्लिम नाही. अर्थात पाकिस्तानातील कट्टरवादी अहमदिया पंथाच्या लोकांना 'मुस्लिम' मानायलाच तयार नाहीत. पाकिस्तानातील सुन्नी समाजाच्या लोकांना कदाचित हे माहीत नसेल की याच अहमदिया समुदायाच्या योगदानामुळे पाकिस्तानची निर्मिती शक्य झाली. पण १९७४ मध्ये एक कायदा करून त्यांनी निर्मिलेल्या जिनांच्या देशातच त्यांना गैरमुस्लिम घोषित करण्यात आले आहे.

सरन्यायाधीश न्यायमूर्ती काझी फैज ईसा यांचे नुसते नाव जरी उच्चारले तरी पाकिस्तानातील इस्लामिक धर्मांध प्रचंड थयथयाट करतात. त्यांचे रक्त उसळते. त्यामुळेच जो माणूस सरन्यायाधीशांचा शिरच्छेद करेल त्याला एक कोटी रुपये देण्यासी घोषणा त्यांनी केली आहे.






सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती.

याच प्रकरणात २४ जुलै रोजी पंजाब राज्य सरकारने याचिका दाखल केली होती, जी सरन्यायाधीशांनी स्वीकारली होती. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयावर पुनर्विचार करावा, असे आवाहन करणाऱ्या अनेक कट्टर इस्लामिक संघटनांच्या वतीनेही

# पाकिस्तानच्या सरन्यायाधीशांना शिरच्छेदाची धमकी

## अंमलबजावणी करणाऱ्याला देणार १ कोटी सुप्रीम कोर्टाच्या आवारात घुसले धर्मांध जिहादी

**ईशनिंदेच्या आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय पाकिस्तानचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती काझी फैज ईसा यांनी दिला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे पाकिस्तानातील धर्मांध, जिहादी संतप्त झाले आहेत. सरन्यायाधीश काझी ईसा यांचा शिरच्छेद करणाऱ्याला एक कोटी रुपये इनाम देण्याची घोषणा धर्मांधांनी केली आहे. तेहरीक-ए-पाकिस्तानचे नेते पीर झहीरुल हसन शाह यांनी स्वतः हे इनाम जाहीर केले आहे. 'एक मोमिन आणि प्रेषित मोहम्मद यांचा गुलाम या नात्याने मी फैज ईसा यांचा शिरच्छेद करणाऱ्या व्यक्तीला एक कोटी रुपये बक्षीस देण्याचे जाहीरपणे घोषित करतो', असे पीर हसन शाह यांनी म्हटले आहे.**

सरन्यायाधीश काझी फैज ईसा यांनी मुबारक अहमद सानी नावाच्या एका अहमदिया नागरिकाची 'ईशनिंदे'च्या 'गुन्ह्या'तून निर्दोष मुक्तता करण्याचा निर्णय दिला होता. न्यायमूर्ती ईसा यांनी 'धार्मिक स्वातंत्र्याच्या अधिकारा' चा हवाला देत आरोपीने 'ईशनिंदे'चा गुन्हा केला नसल्याचे आपल्या निर्णयात नमूद केले होते.

पण हा निर्णय मान्य करतील तर ते मूलतत्त्ववादी कसले? पाहता पाहता पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयाला धर्मांध जिहाद्यांनी वेढा घातला. जमावाने न्यायालयाच्या आवारात घुसून हिंसक आंदोलन सुरू केले आणि सरन्यायाधीशांना राजीनामा देण्यास सांगितले. पोलिसांनी पाण्याचा मारा करून आणि लाठीमार करून त्यांना परिसरातून हटवण्याचा प्रयत्न केला. मात्र, संतप्त जिहादींनी मुळीच मागे न हटता न्यायालय परिसरातच बसकण मारून पोलिसांना व सुरक्षा दलांना घाम फोडला. गेल्या वर्षी, देशाचे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती झालेल्या न्यायमूर्ती फैज ईसा यांच्यासमोर ईशनिंदेचे हे प्रकरण आले होते, ज्यावर त्यांनी या वर्षी फेब्रुवारीमध्ये 'गुन्हेगारा'ला शिक्षा देण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली होती. या प्रकरणाची सुनावणी २९ मे रोजी पूर्ण झाली होती. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने निकाल न देता तो राखून ठेवला होता; या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या न्यायासनात सरन्यायाधीशांव्यतिरिक्त न्यायमूर्ती इरफान सआदत खान आणि न्यायमूर्ती नईम अख्तर अफगाण यांचाही समावेश होता.

या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात २०१९ मध्ये ईशनिंदेच्या आरोपाने झाली. मुबारक अहमद सानी या व्यक्तीने अहमदिया समुदायाशी संबंधित पत्रिकांचे वाटप केल्याचे सांगण्यात आले. त्याला 'पंजाब होली कुरान (मुद्रण आणि रेकॉर्डिंग) (सुधारणा) कायदा, २०२१' अंतर्गत शिक्षा सुनावण्यात आली होती, ज्याला याचिका दाखल करण्यात होत्या. या सर्व याचिका आदल्या दिवशी म्हणजे २२ ऑगस्ट रोजी विचारात घ्यायच्या होत्या. तरीही इस्लामाबादमध्ये या प्रकरणाबाबत प्रचंड गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. राजधानीतील सर्वोच्च न्यायालयाच्या अतिसंवेदनशील भागात हजारो धर्मांधांच्या जमावाने प्रवेश केला आणि न्यायालयाच्या इमारतीसमोर घेराव घातला. एवढेच नव्हे, तर इस्लामाबादच्या अतिसुरक्षित क्षेत्राचे उल्लंघन करून इस्लामिक धर्मांधांनी सर्वोच्च न्यायालयात शिरकाव करण्याचा प्रयत्न केला. सरन्यायाधीश काझी फैज ईसा यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी आग्रही मागणी हे जिहादी करीत होते. 'गुन्हेगारा'ला अशा कायद्याअंतर्गत शिक्षा ठोठावण्यात आली आहे जो २०२१ पूर्वी अस्तित्वातच नव्हता, असे सांगत सरन्यायाधीश ईसा यांच्या न्यायासनाने शिक्षेला स्थगिती दिल्याने हे धर्मांध जिहादी अधिकच संतप्त झाले होते. सरन्यायाधीशांनी सानीला जामीन मंजूर करून त्याला तातडीने मुक्त करण्याचा निर्णय दिला. हे वृत्त पसरताच तेहरीक-ए-लब्बाक पाकिस्तान आणि इतर अनेक कट्टरवादी इस्लामिक संघटनांनी सरन्यायाधीशांच्या विरोधात द्वेषपूर्ण प्रचार मोहीम सुरू केली. या संपूर्ण प्रकरणाची सुरुवात २०१९ मध्ये ईशनिंदेच्या आरोपाने झाली. अहमदिया समुदायाशी संबंधित पत्रिकांचे वाटप सांगण्यात आले. त्याला 'पंजाब होली कुराण (मुद्रण आणि रेकॉर्डिंग) (सुधारणा) कायदा, २०२१' अंतर्गत शिक्षा सुनावण्यात आली होती, ज्याला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली होती.

याच प्रकरणी गेल्या २४ जुलै रोजी पंजाब राज्य सरकारने याचिका दाखल केली होती जी न्यायमूर्तींनी स्वीकारली होती. न्यायालयाने आपल्या निर्णयावर पुनर्विचार करावा, असे आवाहन करणाऱ्या अनेक इस्लामिक संघटनांच्या वतीने याचिकाही दाखल करण्यात आल्या होत्या. या सर्व याचिका कालच्या आदल्या दिवशी म्हणजेच २२ ऑगस्ट रोजी विचारात घ्यायच्या असल्या तरी आज या प्रकरणामुळे इस्लामाबादमध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला होता. इस्लामाबादमधील सर्वोच्च न्यायालयाच्या अतिसंवेदनशील भागात हजारो धर्मांधांच्या जमावाने प्रवेश केला आणि न्यायालयाच्या इमारतीसमोर घेराव घातला.

धर्मांधांचा हा गट/संघटना तेहरीक-ए-लब्बाक पाकिस्तान या नावाने ओळखली जाते. या संघटनेने सरन्यायाधीशांचा शिरच्छेद करणाऱ्याला एक कोटी रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा जाहीर रीत्या केली आहे. या संघटनेचा नेता पीर जहीरुल शाह याने स्वतःच हे बक्षीस जाहीर केले आहे. 'एक मोमिन आणि प्रेषित मोहम्मद यांचा गुलाम या नात्याने मी फैज ईसा यांचा शिरच्छेद करणाऱ्या व्यक्तीला एक कोटी रुपये बक्षीस देण्याचे जाहीरपणे घोषित करतो', असे पीर हसन शाह याने म्हटले आहे. खुद्द माहिती व प्रसारण मंत्री अताउल्लाह तरार यांनी हा चिथावणीखोर व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. 'अशा वक्तव्यांना पाकिस्तानात स्थान नाही. हे खपवून घेतले जाणार नाही. अशा विधानांचा आम्ही तीव्र निषेध करतो. अशा विचारसरणीमुळे पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे,' असे तरार यांनी सांगितले.

(पांचजन्यवरून साभार)

## निसर्ग

सातपुडा ही भारतीय द्वीपकल्पावरील महाराष्ट्र-मध्य प्रदेश या राज्यांदरम्यानची एक पर्वतश्रेणी होय. विंध्य पर्वताच्या दक्षिणेस विंध्यला साधारण समांतर अशी ही पर्वतश्रेणी आहे. मध्य भारतातील पूर्व-पश्चिम गेलेल्या या दोन पर्वतश्रेण्यांनीच उत्तर भारतीय मैदान व दक्षिणेकडील दख्खनचे पठार हे भारताचे दोन मुख्य प्राकृतिक विभाग अलग केले आहेत. गुजरातमधील अरबी समुद्रकिनाऱ्यापासून सुरू होऊन पूर्वेस महाराष्ट्र, मध्य प्रदेश छत्तीसगढ राज्यांपर्यंत या श्रेणीचा विस्तार आढळतो. उत्तरेकडील नर्मदा व दक्षिणेकडील तापी या एकमेकींना साधारण समांतर वाहत जाणाऱ्या दोन पश्चिमवाहिनी नद्यांच्या खचदऱ्या या श्रेणीमुळे अलग झाल्या आहेत. म्हणजेच सातपुड्याची उत्तर सीमा नर्मदेने व दक्षिण सीमा तापी-पूर्णा या नद्यांनी सीमित केली आहे.

सातपुडा पर्वतश्रेणीला 'सातपुडा' हे नाव कसे पडले याविषयी अनेक आख्यायिका आहेत. या पर्वतात एकामागे एक अशा सात डोंगररांगा किंवा सातपुडे (सातवळ्या) ६०० मी. उंचीपर्यंत चढत जातात व नर्मदा नदीकडे एकदम उतरताना दिसतात. त्या रांगा एकमेकींना समांतर मुख्य सातपुड्याचे भूकवच दक्षिण ट्रॅप खडकांनी आच्छादलेले आहे; काही ठिकाणी स्फटिकी खडकांचे आच्छादन आढळते. पंचमढीच्या परिसरात वालुकाश्म खडक उघड्या स्वरूपात दिसून येतात, तर मंडलामधील उंच शिखरे जांभ्या खडकांतील आढळतात. सातपुडा पर्वताचे पश्चिमेकडून पूर्वेकडे स्पष्टपणे तीन भाग दिसतात. अगदी पश्चिमेकडे सातपुडा किंवा राजपीपला टेकड्या, मध्य भागात बेतूल पठार, महादेव व गाविलगड टेकड्या; तर पूर्वेकडे मैकल श्रेणी हे तीन भाग आहेत. त्यांची सरासरी उंची ९०० मी.च्या दरम्यान असून कमी उंचीच्या पठारी प्रदेशांनी ते एकमेकांना जोडले आहेत. प्रामुख्याने असिरगड येथील, तसेच जबलपूरच्या दक्षिणेकडील अशा दोन खंडांनी (गॅप) सातपुडा पर्वतश्रेणीचा संपूर्ण प्रदेश खंडित झाला आहे. या पर्वतश्रेणीचा अगदी पश्चिमेकडील भाग मुख्यतः सातपुडा नावाने ओळखला जात असला, तरी राजपीपला हे स्थानिक नाव पश्चिम भागासाठी प्रचलित आहे. राजपीपला टेकड्यांमुळे नर्मदा व तापी नद्यांची खोरी स्पष्टपणे अलग झालेली दिसतात. हा उंच भाग बेसॉल्ट खडकांपासून तयार झालेला असून सुळके व तीव्र उताराचे कटक असे त्याचे स्वरूप आहे. पश्चिम भागातील मुख्य सातपुडा म्हणजे लाव्हापासून बनलेले अगदी तीव्र उताराचे गटपर्वत दिसतात. महाराष्ट्राच्या धुळे सातपुडा पर्वतश्रेणीत असलेल्या तोरणमाळ पठाराची उंची सस.पासून सुमारे १,००० मी. आहे. याच भागात तोरणमाळ (१,०३६ मी.)

# सातपुडा : भारतातील सर्वांत प्राचीन पर्वतश्रेणी



व घडीसदृश दिसतात. त्यावरून त्यांस सातपुरा-सातपुडा (सेव्हन फोल्ड्स) असे म्हणतात. या सात डोंगररांगा म्हणजे विंध्य पर्वताचे सात पुत्र आहेत असे मानले जाते; म्हणून सातपुत्र (सेव्हन सन्स) संबोधतात, अशी एक आख्यायिका आहे. सांप्रत या संपूर्ण श्रेणीस सातपुडा म्हणतात. गुजरातमधील रतनपूरपासून पूर्वेस अमरकंटकपर्यंत पसरलेल्या सातपुडा या श्रेणीची लांबी सुमारे ९०० किमी. असून कमाल रुंदी सुमारे १६० किमी. पेक्षा अधिक आढळते. भारतातील सर्वांत प्राचीन पर्वतश्रेण्यांपैकी ही एक आहे. ही भारतीय द्वीपकल्पावर पूर्व-पश्चिम पसरलेली व अधिक उंचीची प्राचीन भूसांरचनिक पर्वतश्रेणी आहे. तिच्यातील अनेक शिखरे १,००० मी. पेक्षा अधिक उंचीची आहेत. अगदी काही भागच ५०० मी. पेक्षा कमी उंचीचा आहे. या श्रेणीचा आकार साधारणपणे त्रिकोणाकृती असून तिचा पाया अगदी पूर्वेस उत्तर-दक्षिण पसरलेल्या मैकल डोंगररांगेचा असून शिरोभाग पश्चिमेस रतनपूर येथे येतो. सातपुड्याने एकूण सुमारे ७५,००० चौ. किमी. क्षेत्र आहे. काही वेळा, परंतु चुकीने विंध्य पर्वतांतर्गतच सातपुडा पर्वताचा समावेश केला जातो. सह्याद्री (पश्चिम घाट) व सातपुडा हे एकमेकांशी काटकोनात पसरलेले पर्वत असून सातपुडा हा सह्याद्रीचाच विस्तारित भाग असल्याचा एक मतप्रवाह आहे. सातपुड्याचा काही भाग वलीकरण व ऊर्ध्वगामी भूहालचालीतून निर्माण झाल्याचे काही पुरावे मिळतात. हे गिरिस्थान आहे. येथील गोरखनाथ मंदिर प्रसिद्ध आहे. बऱ्हाणपूर-खांडवा दरम्यान ही श्रेणी खंडित झालेली असून त्या खंडातील सस.पासूनची उंची ३६५ मी. आहे. या खंडभागातून मुंबई-आग्रा लोहमार्ग जातो. याच भागात अशिरगड हा डोंगरी किल्ला हा खंड एकेकाळी नर्मदा नदीखोऱ्याने व्यापला असावा, असा अंदाज वर्तविला जातो. नर्मदा खोऱ्याकडे विशेषतः तिच्या देवगंगा व गोई या उत्तरवाहिनी उपनद्यांच्या दरम्यान ही रांग अधांतरी किंवा झुकल्याप्रमाणे दिसते. सातपुडा पर्वतश्रेणीत असलेल्या उंच पठारी प्रदेशांतील बेतूल व मैकल ही दोन पठारे महत्त्वाची आहेत. सातपुड्याचा मध्यभाग बेतूल या लाव्हाजन्य पठाराने व्यापला तो उत्तरेस महादेव टेकड्यांनी, तर दक्षिणेस गाविलगड टेकड्यांनी सीमित केलेला आहे. बेतूल पठाराची उंची १,२०० मी. पर्यंत वाढत गेली असून त्याचा माथा घरंगळणी स्वरूपाचा व गवताळ आहे. सातपुड्याची मध्य भागातील रुंदी बऱ्यापैकी वाढलेली असून तेथे अरीय स्वरूपाची नदीप्रणाली निर्माण झाली आहे. यातील महादेव टेकड्या म्हणजे आर्कियन व मध्य गोंडवनकालीन मोठी भूसांरचनिक खिडकी (टेक्टॉनिक विंडो) आहे. महाराष्ट्राच्या अमरावती जिल्ह्यातील डोंगरांना मेळघाट, गाविलगड टेकड्या असे म्हणतात. तापी नदीच्या खिंडारानंतरचा (गॅप) मेळघाट हा सातपुड्याचाच विस्तारित भाग आहे.

(संकलित)

## प्रासंगिक

पंकज जगन्नाथ जयस्वाल

ज्या शक्तींना भारत तोडायचा आहे ते नेहमीच हिंदूंची एकता तोडण्याचे काम करतात जेणेकरुन ते राजकीय आणि नोकरशाही शक्तीचा वापर स्वतःच्या फायद्यासाठी करू शकतील, सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या राष्ट्राचा नाश करू शकतील आणि प्रत्येक भारतीयामध्ये गुलामगिरी निर्माण करू शकतील. हिंदूंमध्ये जातीच्या आधारावर फूट पाडणे ही त्यांची नियमित रणनीती आहे. ते अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि आणि ओबीसी लोकांच्या मनात विष कालविण्यासाठी खोटे नॅरेटिव्ह अर्थात कथा रचतात आणि त्यांना हिंदू आणि हिंदुत्वाचा द्वेष करायला शिकवतात. जरी ते अंशतः यशस्वी झाले, तरीही त्यांनी देशाची एकता, एकात्मता आणि हिंदूंचे ऐक्य व एकतेचे मोठ्या प्रमाणात नुकसान केले. या खोट्या नॅरेटिव्हचा मुकाबला करण्याची आणि सर्वांच्या हितासाठी हिंदूंना संघटित करण्याची हीच वेळ आहे.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या मनात विष कालवणाऱ्या दोन खोट्या नॅरेटिव्हचे परीक्षण करूया. त्यातील पहिले म्हणजे समान नागरी कायदा आरक्षण घालवण्यासाठी आणला जातोय् आणि दुसरे नॅरेटिव्ह म्हणजे उच्चवर्णीय हिंदूंनी जाती आणि जातिभेदाची व्यवस्था निर्माण केली.

### समान नागरी कायदा

समान नागरी कायद्याची संकल्पना सर्व धर्म आणि सामाजिक गटांसाठी एकसमान नागरी संहिता (विवाह, दत्तक, वारसा, घटस्फोट इत्यादी) स्थापन करणे होय. भारतात आता अनेक कौटुंबिक कायदे आहेत; एकसमान नागरी संहिता लागू केल्याने कायद्यांमध्ये सुसूत्रता येईल, परिणामी कार्यक्षमता आणि पारदर्शकता येईल. प्रमाणित नागरी संहिता असण्याचे अनेक फायदे आहेत. आरक्षण म्हणजे समान संधी आणि वंचित लोकसंख्येला दिलेली ही एक प्रकारची आश्वासक व होकारार्थी कार्यवाही होय. आरक्षणाचा समान नागरी संहितेशी संबंध नाही. समान नागरी संहिता धर्माबाबत आहे, तर आरक्षण सामाजिक समतेबाबत आहे. जरा विचार करा, समान नागरी संहिता लागू झाली तर इस्लामिक कायद्याप्रमाणे त्यांना चार बायका करता येणार नाहीत, ते मुस्लिम महिलांशी भेदभाव करू शकणार नाहीत. इस्लामिक कायदा यापुढे विवाहासारख्या वैयक्तिक बाबींवर लागू होणार नाही. मुस्लिम मुलीला वयाच्या पंधराव्या वर्षी विवाह करता येणार नाही. ते



तिहेरी तलाक आणि निकाह हलाला लादू शकणार नाहीत. मुस्लिम महिलांनाही दत्तक घेण्याचा अधिकार असेल. त्यांना मालमत्तेवर समान अधिकार असतील. मुल्ला-मौलवी न्यायाधीश म्हणून आपली शक्ती गमावतील. सर्व प्रकरणांचा न्यायालयात निर्णय होईल. या सर्व सकारात्मक गोष्टी आहेत. तथापि, काही मुस्लिम या नियमांना इस्लामविरोधी मानू शकतात आणि त्यांचा विरोध करू शकतात. त्यांना प्रागैतिहासिक काळात जगायचे आहे का? काहींच्या टीकेनंतरही, मुस्लिम समाजावर युसीसीचा अर्थात समान नागरी संहितेचा सकारात्मक प्रभाव पडणार आहे.

# संघटित हिंदू; समर्थ भारत

### डॉ. आंबेडकरांचे समान नागरी कायद्याबद्दलचे विचार

'नागरिकांसाठी एकसमान नागरी संहिता-संपूर्ण भारतभर नागरिकांसाठी समान नागरी संहिता सुनिश्चित करण्याचा राज्य प्रयत्न करेल' हे अनुच्छेद ४४ मध्ये नमूद केले आहे, जे राज्य धोरणाच्या निर्देशात्मक तत्त्वांतर्गत आपल्या राज्यघटनेच्या भाग चारमध्ये समाविष्ट असलेल्या १६ कलमांपैकी एक आहे (अनुच्छेद ३६ ते ५१). कलम ४४ हे संविधान सभेत २३ नोव्हेंबर १९४८ रोजी डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी या संदर्भात विवेचन केल्यानंतर त्याच दिवशी एकमताने पारित करण्यात आले. तथापि, चर्चेदरम्यान, काही मुस्लिम सदस्यांनी एक तरतूद जोडण्यासाठी दुरुस्त्या प्रस्तावित केल्या. म्हणजे, कोणताही गट, वर्ग, समुदाय किंवा लोक त्यांच्याकडे असा कोणताही कायदा असल्यास, त्यांचा वैयक्तिक कायदा सोडण्यास बांधील राहणार नाहीत. कायद्याने हमी दिलेल्या कोणत्याही समुदायाचा वैयक्तिक कायदा समाजाच्या पूर्वीच्या मान्यतेशिवाय बदलला जाणार नाही. या दुरुस्त्यांवर दिवसभर चर्चा सुरू होती.

यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या उत्तरात म्हणाले, 'मला भीती वाटते की या चर्चेत मांडलेल्या दुरुस्त्या मी स्वीकारू शकत नाही. माझे मित्र, श्रीमान हुसेन इमाम यांनी, दुरुस्तीचे समर्थन करताना, एवढ्या विशाल देशासाठी एकसमान कायदा असणे शक्य आहे आणि इष्ट आहे का, असा प्रश्न विचारला. आता मला कबूल केले पाहिजे की त्या विधानाने मला खूप आश्चर्य वाटले. कारण आपल्या देशात मानवी संबंधांच्या जवळजवळ सर्व पैलूंचा समावेश असलेला एकसमान कायदा आहे. आमच्याकडे संपूर्ण देशात एकसमान आणि संपूर्ण गुन्हेगारी संहिता आहे, जी दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता मध्ये समाविष्ट आहे. आमच्याकडे मालमत्तेच्या हस्तांतरणाचा कायदा आहे, जो मालमत्तेशी संबंधित आहे आणि जो संपूर्ण देशात लागू आहे आणि मी असंख्य कायदे उद्धृत करू शकतो ज्यामुळे हे सिद्ध होईल की या देशात व्यावहारिकपणे नागरी संहिता आहे, ज्याची सामग्री एकसमान आहे आणि संपूर्ण देशात लागू आहे.''

ही वस्तुस्थिती अतिशय स्पष्टपणे दर्शवते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांसाठी नागरी आचरणात एकसमानता सुनिश्चित करण्यासाठी समान नागरी संहिता स्थापन करण्यास समर्पित होते. परंतु नागरी संहितेला आरक्षणाशी जोडण्याचा त्यांचा कोणताही हेतू नव्हता. तथापि, त्यांना सत्तेत असलेल्या आणि संसदेच्या अनेक सदस्यांनी सतत आव्हान दिले आणि दबाव आणला. या मंडळींनी एकतर संविधानाचा आदर करण्यास नकार दिला किंवा हिंदूंमध्ये फूट पाडण्याची संधी शोधली. कोणतेही मत बनवण्यापूर्वी, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समान नागरी संहितेबाबत काय म्हटले होते याचा विचार केला पाहिजे.

### जातिव्यवस्था कोणी सुरू केली?

सध्याची जातिव्यवस्था, ज्यामध्ये जातीची व्याख्या जन्मानुसार केली जाते, तिचे वर्णन वैदिक साहित्यात नाही. श्रमाची वैदिक सामाजिक विभागणी मूळतः वर्णाश्रम म्हणून ओळखली जात होती. भगवद्गीता (४.१३) सांगते की वर्णाश्रम प्रणाली जन्मापेक्षा योग्यता आणि कृतीवर किंवा आधुनिक भाषेत कौशल्य आणि क्षमतेवर आधारित आहे. छांदोग्य उपनिषदानुसार, गौतम ऋषींनी दासीचा मुलगा सत्यकाम जाबाली याला ब्राह्मण म्हणून घोषित केले. कारण तो अढळ सत्यनिष्ठ होता, जे खऱ्या ब्राह्मणाचे वैशिष्ट्य आहे. सुता गोस्वामी, कनका, कांचीपुरम, तिरुवल्लूवर, सूरदास आणि हरिदास ठाकूर हे सर्व उपेक्षित कुटुंबात जन्माला आलेले असूनही संत म्हणून पूज्य होते. एक प्रसिद्ध वैदिक सूत्र पुनरावृत्ती करते:

**जन्मना जायते शूद्रः संस्कारात् भवेत द्विजः।**
**वेद पाठात् भवेत् विप्रःब्रह्म जानातीति ब्राह्मणः॥**

प्रत्येकजण शूद्र म्हणून जन्माला आला आहे, याचा अर्थ ते अयोग्य आहेत. आध्यात्मिक दीक्षा एखाद्या व्यक्तीला नवजात बनवते. म्हणजेच त्याचे आध्यात्मिक अस्तित्व सुरू होते. वैदिक शास्त्रांचा अभ्यास केल्याने, माणूस विद्वान बनतो. संपूर्ण सत्य समजून घेतल्यानेच ती व्यक्ती विद्वान बनते. माणूस ब्राह्मण होतो.

रंजीव कुरुप आपल्या 'द हिस्ट्री अँड फिलॉसॉफी ऑफ हिंदूइझम' या पुस्तकात संदर्भांसह लिहितात, ब्रिटिशांनी लादलेल्या जातिव्यवस्थेशिवाय भारतात कोणतीही जातिव्यवस्था नव्हती. त्यामुळे १८७१ च्या पहिल्या वसाहती जनगणनेपासून त्यांनी ही प्रक्रिया का आणि कशी स्वीकारली हे समजून घेण्यासाठी तुम्हाला ब्रिटीश रेकॉर्ड वाचण्याची आवश्यकता आहे. (रिस्ले १८९१). बऱ्याच भारतीयांना अजूनही वाटते की कास्ट/जाती हा शब्द प्राचीन भारतीय जमाती/समुदायांचा संदर्भात येतो आणि 'समुदाय'च्या जागी 'जात' हा शब्द वापरला जातो. वास्तविक तसे नाही. जाती हे रेस (Race) साठी पोर्तुगीज भाषेतील संकल्पना आहे, एकल-रेस भारतातील एक अर्थहीन संकल्पना आहे. इंग्रजांना वेदात जातीसाठी खोटी शास्त्रीय मान्यता देखील आढळली. हा श्लोक ऋग्वेदातील १०.९०.१२ आहे आणि ब्रिटिशांनी त्याचा कसा चुकीचा अर्थ लावला, तसेच हिंदू परंपरांमध्ये त्याचा नेमका अर्थ काय आहे हे स्पष्टपणे समजून घेतले पाहिजे.

**ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥**

ब्रिटिशांनी चुकीचा अर्थ लावला

पदानुक्रमाच्या शीर्षस्थानी ब्राह्मण होते जे प्रामुख्याने शिक्षक आणि बुद्धिजीवी होते आणि ते ब्रह्मदेवाच्या मस्तकापासून त्यांची निर्मिती झाली आले होते असे मानले जाते. त्यानंतर क्षत्रिय किंवा योद्धे आणि राज्यकर्ते आले, ब्रह्मदेवाच्या बाहूंपासून त्यांची निर्मिती झाली. तिसरे स्थान वैश्य किंवा व्यापाऱ्यांना गेले जे त्यांच्या मांड्यांपासून बनवले गेले व ब्रह्मदेवाच्या चरणी येऊन सर्व क्षुल्लक नोकऱ्या करणारे शूद्र होते.

**योग्य अर्थः** ज्ञान, कुलीनता, उद्योग आणि सुविधा हे आपले अत्यंत इष्ट गुण आपल्याला भगवंताकडून मिळतात. (ऋग्वेद १०.९०.१२॥)

### रा. स्व. संघ आणि सामाजिक समता

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आपल्या स्थापनेपासून हिंदू समाजातील जातिभेद दूर करण्याचे कार्य करीत आहे. विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून तळागाळात केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. वनवासी कल्याण आश्रम, रा. स्व. संघाच्या संघटनांपैकी एक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर जमातींचे जीवन सुधारण्यासाठी कार्य करते, गरीब आणि उपेक्षित लोकांच्या उन्नतीसाठी आपुलकीने कार्य करते. रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजी यांनी जातिभेदावर आधारित दरी भरून काढण्यासाठी अनेक प्रयत्न केले. संघाच्या इतर सर्वोच्च नेत्यांप्रमाणेच त्यांनी गरीब आणि उपेक्षितांच्या कल्याणासाठी अनेक उपक्रम, संस्था, संघटना आणि कार्यक्रम सुरू केले आणि आजही हे प्रयत्न सुरू आहेत. गोळवलकर गुरुजींनी संघ स्वयंसेवकांचा वापर करून वर्णाश्रमाचा हिंदू धर्माचा भाग म्हणून प्रचार करण्यास नम्रपणे नकार दिल्याने रामराज्य परिषद या राजकीय पक्षाचे संस्थापक व प्रमुख स्वामी करपात्री हे त्यांच्यावर नाराज झाले होते. सर्व जातीच्या लोकांना धार्मिक संस्कार, मंदिरातील पूजा, वेदाभ्यास आणि सर्वसाधारणपणे आपल्या सर्व सामाजिक आणि धार्मिक व्यवहारात समान अधिकार आणि पायरी दिली पाहिजे, असे श्रीगुरुजींचे ठाम प्रतिपादन होते. आपल्या हिंदू समाजातील जातीयवादाच्या सर्व समस्यांवर हा एकमेव योग्य उपाय आहे. या भव्य राष्ट्राचे नुकसान करणारे खोटे नॅरेटिव्ह, कथा रचण्यापेक्षा आपण भारताला उन्नत व बळकट करणाऱ्या मूल्यांवर भर देऊ या.

७८७५२१२१६१

संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# युक्रेन भेटीचा संदेश काय?

## विश्वसंचार

प्रा. डॉ. विजयकुमार पोटे

**युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही; संवादाचे दरवाजे खुले ठेवणे तसेच वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग काढणे महत्त्वाचे आहे, हे नरेंद्र मोदी यांनी ताज्या युक्रेन दौऱ्यात पुन्हा बजावून सांगितले. त्याचा काही परिणाम होतो का, हे आता पाहायचे. दरम्यान, व्यापारीदृष्ट्या महत्त्वाच्या युक्रेनबरोबर झालेल्या ताज्या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आदी क्षेत्रांमध्ये सहकार्य सुनिश्चित होईल.**



गेल्या अडीच वर्षांपासून रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरू असून युद्धाच्या झळा या दोन देशांपुरत्याच मर्यादित राहिलेल्या नाहीत; अवघे जग त्यात होरपळत आहे. भारताने या युद्धाबद्दल थेट रशियाचा निषेध केला नसला, तरी युद्ध हा कोणत्याही समस्येवरचा मार्ग नाही. संवादाचे दरवाजे खुले ठेवणे हाच मार्ग असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. रशिया हा भारताचा जसा मित्र आहे, तसाच युक्रेनही व्यापारीदृष्ट्या भारतासाठी महत्त्वाचा देश आहे. त्यामुळे दोन्ही देशांशी भारताला चांगले संबंध ठेवायचे आहेत. त्यामुळे तर तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशियाचा दौरा केला आणि त्यानंतर आता युक्रेनला भेट दिली. सोव्हिएत महासंघातून १९९२ मध्ये बाहेर पडल्यानंतर युक्रेन हा देश स्वतंत्र झाला. स्वतंत्र राष्ट्र झाल्यानंतर युक्रेनला भेट देणारे मोदी हे पहिलेच भारतीय पंतप्रधान आहेत. साहजिकच पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्याकडून सर्वांना मोठ्या अपेक्षा होत्या. तेथे रवाना होण्यापूर्वी खुद्द मोदी खूप उत्साहात होते. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांना भेटण्यास उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले होते. झेलेन्स्की यांनी त्यांचे अतिशय प्रेमाने स्वागत केले आणि तेथील युद्ध परिस्थितीची माहिती दिली. दोन्ही नेत्यांमधील चर्चेत युद्ध थांबविण्याचे मार्ग शोधण्यावर भर होता. वाटाघाटी आणि शांततेच्या मार्गानेच युद्धातून मार्ग निघू शकतो, असा कानमंत्र पुन्हा मोदी यांनी झेलेन्स्की यांना दिला आहे. दोन्ही देशांनी चार करारांवर स्वाक्षऱ्याही केल्या. या करारांमुळे कृषी, अन्न उद्योग, औषध, संस्कृती आणि मानवतावादी सहाय्य या क्षेत्रात सहकार्य सुनिश्चित होईल.

पंतप्रधानांच्या युक्रेन दौऱ्यावर जगाचे लक्ष होते. कारण रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेले युद्ध केवळ भारतच थांबवू शकतो, हे सुरुवातीपासूनच अधोरेखित केले जात होते; मात्र भारत सुरुवातीपासूनच दोन्ही देशांच्या राष्ट्रप्रमुखांना युद्धाचा मार्ग सोडण्याचे आवाहन करत आहे. युक्रेनला रवाना होण्यापूर्वीच पंतप्रधान म्हणाले होते की, ही युद्धाची वेळ नाही. युद्ध कोणतीही समस्या सोडवू शकत नाही. युक्रेनपूर्वी पंतप्रधान रशियालाही गेले होते. तेव्हा झेलेन्स्की यांनी नाराजी व्यक्त केली होती. रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे जगातील सर्वात मोठे गुन्हेगार असल्याचे सांगून मोदी यांनी त्यांना मिठी मारल्याबद्दल त्यांनी टीका केली होती; पण आता ते भारतासोबतचे संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक दिसत होते. पंतप्रधानांचा युक्रेन दौरा अशा वेळी झाला, जेव्हा युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ले तीव्र केले आहेत. हे पाहता पंतप्रधानांच्या आवाहनाचा युक्रेन किंवा रशियावर कितपत परिणाम होईल, हे सांगणे कठीण आहे. यापूर्वी अनेक प्रसंगी मोदी यांनी पुतिन यांना फोनवर किंवा समोरासमोर बोलून युक्रेनवरील हल्ले थांबविण्याचे आवाहन केले आहे. नुकत्याच झालेल्या रशियाच्या दौऱ्यातही मोदी यांनी पुतिन यांना असेच आवाहन केले होते; पण आजपर्यंत असा एकही प्रसंग दिसला नाही, जेव्हा रशियाने भारताच्या आवाहनाबाबत गांभीर्य दाखवले असेल. शांघाय शिखर परिषदेदरम्यान समोरासमोर चर्चेनंतर पुतिन यांनी भारतीय पंतप्रधानांचे आवाहन गांभीर्याने घेतल्याचे दिसत होते; मात्र तेथून परतताच त्यांनी युक्रेनवरील हल्ले अधिक तीव्र केले.

रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम संपूर्ण जगावर झाला आहे. युक्रेनमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक मारले गेले आहेत, त्यांच्या मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. युक्रेनचा व्यापार विस्कळीत झाला आहे. त्याला युद्धबंदीचा करार हवा आहे, पण तो रशियाच्या अटी मान्य करायला तयार नाही. युक्रेनने 'नाटो'चे सदस्यत्व सोडावे, अशी रशियाची अट आहे. दोघांपैकी कोणीही कोणत्याही प्रकारे झुकायला तयार दिसत नाही. अशा स्थितीत आपण वाटाघाटीसाठी कसे बसू शकतो, हा सर्वात कठीण प्रश्न आहे. भारतालाही त्यांच्यासाठी संवादाचा मार्ग शोधणे सोपे नाही; पण पंतप्रधानांनी दोन्ही देशांचे एक एक करून केलेले दौरे आणि युद्धाचा मार्ग सोडण्याचे केलेले आवाहन यामुळे जागतिक बंधुतेचा मार्ग मोकळा झाला आहे. रशिया आणि युक्रेन काहीसा लवचीक दृष्टिकोन स्वीकारतील आणि करारासाठी मध्यम मार्ग अवलंबण्यास सहमत होतील, अशी अपेक्षा आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांच्या खांद्यावर हात ठेवून पंतप्रधान मोदींनी एक-दोन नव्हे तर तीन महत्त्वाची पावले उचलली आहेत. मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी अर्थपूर्ण चर्चा केली आणि रशियासोबत सुरू असलेले युद्ध संपविण्यासाठी वैयक्तिकरीत्या योगदान देण्याचे आश्वासन दिले. मोदी यांनी 'एक्स'वर लिहिले की, युक्रेन भेट ऐतिहासिक होती. भारत-युक्रेन मैत्री आणखी घट्ट करण्याच्या उद्देशाने मी या महान देशात आलो आहे. माझे झेलेन्स्की यांच्याशी फलदायी संभाषण झाले. शांतता कायम राहिली पाहिजे, यावर भारताचा ठाम विश्वास आहे.

मोदी यांनी झेलेन्स्की यांच्याशी व्यापक चर्चा केली. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी रशियाने युक्रेनवर हल्ला केला. तेव्हापासून आजतागायत दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरूच आहे. मोदी आणि झेलेन्स्की यांनी युक्रेनमधील शांतता आणि सुरक्षेबाबतही चर्चा केली. रशिया-युक्रेन युद्धादरम्यान भारत तटस्थ किंवा उदासीन प्रेक्षक नव्हता आणि नेहमीच शांततेच्या बाजूने होता, असे मोदी म्हणाले. दोन्ही देशांच्या प्रमुख नेत्यांची भेट जगासाठी मोठा संदेश आहे. त्यांच्यातील द्विपक्षीय बैठकीमुळे दोन्ही देशांमधील संबंध अधिक दृढ होतील. रशियासोबतच्या युद्धावर शांततापूर्ण वाटाघाटीतून तोडगा काढण्याच्या दिशेने दोन्ही देश वाटचाल करतील. मोदी यांच्या युक्रेन आणि पोलंड दौऱ्यानंतर अमेरिकेसह पाश्चात्त्य देशांना खात्री पटली आहे की, भारत युक्रेनसोबत एकत्र पुढे जात आहे. म्हणजे भारताचा कल ना रशियाकडे आहे ना पाश्चात्त्य देशांकडे. जागतिक राजकीय पटलावर भारत तोच मार्ग स्वीकारेल, जो भारत आणि जगासाठी चांगला असेल, हे सर्व देशांना कळून चुकले आहे. आज तीन आघाड्यांवर भारताची नजर आहे. पहिली गोष्ट म्हणजे युरोपच्या शांतता उपक्रमात भारताचा समावेश करणे. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे युक्रेनवरील रशियन आक्रमणामुळे निर्माण झालेल्या जागतिक भू-राजकीय गोंधळात भारताचा सहभाग वाढविणे आणि तिसरा मुद्दा सोव्हिएत काळापासून थंडावलेले युक्रेनसोबतचे भारताचे राजनैतिक संबंध पुनरुज्जीवित करणे.

युक्रेनमधील युद्ध संपविण्याच्या प्रश्नावर पंतप्रधान मोदी यांच्याकडे कोणतीही भव्य योजना नाही, असे पूर्वी दिसत होते. युद्ध आणि शांतता या विषयावर झेलेन्स्की यांच्याशी दीर्घ आणि सखोल चर्चेसाठी मोदी यांचा वॉर्सा ते युक्रेन ते कीव असा लांब रेल्वे प्रवास हा एक महत्त्वाचा टप्पा मानला गेला. कीवला दुसरी शांतता योजना हवी होती. मोदी यांनी युक्रेनच्या चिंता समजून घेतल्या. राष्ट्र म्हणून अस्तित्वाच्या दृष्टीने त्या महत्त्वाच्या होत्या. युक्रेनला या मुद्यावर भारताकडून पाठिंबा मिळत नव्हता. झेलेन्स्की यांना आशा आहे की, युक्रेनचे प्रकरण ऐकण्यासाठी आणि शांतता प्रयत्नांना हातभार लावण्याची मोदी यांची इच्छा त्यांच्याबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करेल. कारण युद्धाचे प्रचंड आर्थिक परिणाम असूनही दक्षिणेतील मोठा भाग अलिप्त राहिला आहे. दुसरीकडे युक्रेनमधील युद्धाचे भू-राजकीय परिणाम समोर येत असताना, मोदी यांची कीव भेट हे जगाला नव्याने आकार देणाऱ्या संघर्षात भारत यापुढे मूक प्रेक्षक म्हणून राहणार नाही, याचे द्योतक आहे. मोदी वॉर्सा ते कीव असा प्रवास करत असताना चीनचे पंतप्रधान ली कियांग मॉस्कोला भेट देत होते. युक्रेनमधील युद्धाची रूपरेषा तयार करण्यात चीनच्या वाढत्या भूमिकेची ही झलक आहे. भारत आपल्या हिताला महत्त्व देत आहे. अमेरिकेत युरोपपासून दूर जाण्याच्या रिपब्लिकन कल्पनेला आता डेमोक्रॅट्सकडून आव्हान दिले जात आहे. त्या चर्चेच्या निकालाचा भारताच्या सुरक्षा धोरणावर मोठा परिणाम होईल.

सरत्या आठवड्यात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या वॉशिंग्टनमधील उपस्थितीने अमेरिकेशी भारताचे वाढणारे धोरणात्मक संबंध अधोरेखित केले, तर राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन आणि झेलेन्स्की यांच्याशी मोदी यांच्या जलद भेटींनी त्यांच्या हितसंबंधांवर प्रकाश टाकला. भारत आणि युक्रेनमधील संबंध मजबूत करणे, भारत आणि युक्रेनमधील द्विपक्षीय संबंध पुनर्संचयित करण्याच्या दृष्टीनेही मोदी यांचा युक्रेन दौरा महत्त्वाचा होता. सोव्हिएत काळात, भारताला युक्रेनमध्ये प्रवेशाचा विशेषाधिकार होता; परंतु कीवला स्वातंत्र्यानंतर भारतासोबतच्या संबंधांमध्ये कोणतीही उबदारता लाभली नाही. युक्रेनमध्ये भारताप्रती असलेली विलक्षण सद्भावना मोदी यांच्या कीवमध्ये झालेल्या हार्दिक स्वागतातून दिसून आली. मोदी आणि झेलेन्स्की यांनी आपल्या संबंधांना धोरणात्मक भागीदारीमध्ये रूपांतरित करण्याची, त्यांच्या आर्थिक आणि संरक्षण संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची आणि सांस्कृतिक संबंधांना पुनरुज्जीवित करण्याची दाखवलेली वचनबद्धता युक्रेन आणि भारत दोघांसाठीही महत्त्वाची आहे.

# परिवर्तनासाठी यावे गणेशा

## खास बात

आरती अंकलीकर

संगीताप्रमाणेच समाज आणि त्यात साजरे होणारे सणही परिवर्तनशील असतात. याचा अनुभव सगळेच घेत आहेत. गणेशोत्सवही याला अपवाद नाही. हा सण नेहमीच आनंद, सुख-सौख्य घेऊन येतो. या काळात होणारी सामाजिक घुसळण अनेक चांगले मापदंड प्रस्थापित करून जाते. यंदाही त्याचीच पुनरावृत्ती व्हावी आणि नकारात्मकतेची जळमटे झटकून समाज एकसंध करण्याची शक्ती गणेशाने प्रत्येकाला द्यावी.

गणेशाचे आगमन होत आहे. त्याचा आनंद सगळीकडे जाणवतोय. यात आबालवृद्ध सहभागी होतात आणि पर्वणी साधत अनेकानेक उपक्रम राबवतात. या उत्सवाचे, खऱ्या अर्थाने लोकोत्सवाचे बदलते रंग, बदलते ढंग आपण पाहिले आहेत. पूर्वी गणेशोत्सवाचे स्वरूप, रूप वेगळे होते. आता आणखी वेगळे आहे. पण काळ नेहमी पुढेच जात असतो. संगीतासारखेच जीवन परिवर्तनशील असल्याचे सूत्र आपण सगळेच जाणतो आणि मानतो. वेळ बदलते तसे संगीत बदलत असते आणि त्याचप्रमाणे जीवनही कायम बदलताना दिसते. गणेशोत्सवासारख्या सणांच्या निमित्ताने याची तीव्रतेने जाणीव होते.



गणेशोत्सव म्हटला की डोळ्यासमोर येतो तो सासरी म्हणजेच मुंबईतील आमच्या शास्त्री हॉलमध्ये साजरा होणारा उत्सव. तिथे मंडप घालण्यापासून पुढील प्रत्येक काम सोसायटीतील सदस्यांकडून केले जाते. येथील रहिवासी हा उत्सव अतिशय भक्तिभावाने, पावित्र्य राखत, जुना बाज कायम ठेवून नवतेचे स्वागत करत साजरा करतात. त्यामुळेच हा एक सर्वांगसुंदर सोहळा होऊन जातो. उत्सवासाठी मोठा मांडव घातला जातो. सुंदर स्टेज असते. जाणकार मंडळी दरवर्षी त्याच आनंदाने हे काम करतात. अत्यंत परंपरागत पद्धतीने इथे गणपती बसवला जातो. सजावटही जुना बाज राखणारी आणि वैभव जपणारी असते. एकत्रित प्रयत्नांमध्ये उभ्या राहिलेल्या सुबक आणि सुंदर मंडपात गणरायाची प्रतिष्ठापना झाल्यापासून उत्सवाचा संपूर्ण काळ भारलेला होऊन जातो. पहिल्या दिवशी गणपतीची मंगलमय मूर्ती आणताना ढोलक, लेझीम आणि टाळांचा गजर सुरू असतो. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेली इथली मुले-मुली पालखीच्या मागे-पुढे वादन करत गणपतीला मिरवून आणतात. गणरायाचा गजर होतो. गणेशाची मूर्ती अगदी छोटी, जवळपास एक फुटाचीच असते. त्याची सुंदरशी मिरवणूक आमच्या वाडीमध्ये येते तेव्हाची वातावरणनिर्मिती शब्दातीत म्हणावी लागेल. मग पुढचे दहा दिवस अनेक उपक्रम राबविले जातात. अभ्यासू लोक आपली मते मांडतात. चांगल्या वक्त्यांच्या भाषणांचा लाभ घेता येतो. कीर्तन-प्रवचनासारखे कार्यक्रमही होतात. रहिवाशांनी बसवलेले करमणुकीचे कार्यक्रम होतात, विनोदी नाटके होतात आणि आधी उल्लेख केल्याप्रमाणे वैचारिक, आध्यात्मिक, प्रबोधनपर कार्यक्रमांची रेलचेलही पाहायला मिळते. थोडक्यात, असा सुरेख संगम असणारा गणेशोत्सव मला मनापासून भावतो.

यंदा तर गणेशाचे आगमन माझ्यासाठी विशेष आनंददायी आहे. गणेश आगमनाच्या अगदी काही दिवस आधी भारतरत्न पं. भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित होणे, हा मी फार मोठा बहुमान समजते. त्या पुरस्काराने माझ्या जीवनाचा गौरव होत असल्याची भावना आणि महाराष्ट्र शासनाकडून सन्मानित झाल्याची बाब आत्यंतिक सुखावणारी आहे. स्वाभाविकच यंदाचा गणेशोत्सव माझ्यासाठी आगळा आहे, असे म्हणता येईल. सामाजिकदृष्ट्या विचार करायचा तर यंदा पावसानेही सगळीकडे चांगली हजेरी लावली आहे. पाण्याची चिंता दूर झाली आहे. साहजिकच या सुजलाम् सुफलाम् वातावरणाचा सकारात्मक प्रभाव यंदाच्या सणपर्वावर दिसून येत आहे. अर्थात पुरामुळे जागोजागी झालेले नुकसानही विसरून चालणार नाही. पुराचा फटका बसून अनेकांचे संसार उद्ध्वस्त झालेले आपण पाहिले आहेत. त्यामुळेच पुढल्या वर्षी कोणावरही अशी वेळ येऊ नये, अशी मनोकामना व्यक्त करतच आपण गणेशाचे स्वागत करायला हवे.

अलिकडेच कोलकाता आणि बदलापूरमधील घटनांनी अनेक प्रश्न आणि शंका उपस्थित करून गेल्या. यानिमित्ताने एकत्र आलेला समाज आणि जागृत झालेल्या सामाजिक जाणिवांची अनुभूती आपण घेतली. या घटनांनी प्रत्येक जण हेलावून गेलेला दिसला. या समाजाचा भाग असल्याबद्दल खेद वाटावा, अशीही भावना काहींमध्ये दिसली. साहजिकच यंदाच्या गणेशोत्सवावरही या घटनांचा प्रभाव असणार आहे. विशेषत: या सणाचे औचित्य साधत समाजसुधारणेतील आपली जबाबदारी ओळखण्याची आणि ती पार पाडण्याची वेळ प्रत्येकाने ओळखायला हवी. कारण आज प्रत्येकाला त्यासाठी काही ना काही करायचे आहे. आवाज उठवायचा आहे. अन्यायाला वाचा फोडायची आहे. पण एकट्यादुकट्या माणसाकडे हे धैर्य, एवढा वेळ, एवढी शक्ती असतेच असे नाही. मात्र आता काही काळासाठी का होईना, आपण एकत्र येतोय. चर्चा घडणार आहे. या संधीचा फायदा करून घ्यायला हवा. या कामी गणेशाने आपल्याला सामर्थ्य द्यावे, हे माझे त्याच्याकडे आवाहन असेल.

आता स्त्री सशक्त झाली आहे. पण या सशक्त स्त्रीला कसे स्वीकारावे, तिला कसे सन्मानित करावे, तिचे उंचावलेले स्थान कसे जपावे हे आजही अनेकांना समजलेले दिसत नाही. पुरुषी वर्चस्वाखाली, नको त्या दंभाखाली ते आजही तिचे स्थान नाकारतात. तिला कह्यात ठेवू इच्छितात. त्या दृष्टीने आपल्या मुलांना, नातवंडांना काय शिकवावे, याचाही विचार या उत्सवानिमित्ताने व्हायला हवा. कारण सध्याची स्थिती, घटना प्रत्येकाला अंतर्मुख करणाऱ्या आहेत. सतत दुसऱ्यांकडे बोटे दाखवून आता चालणार नाही. परिस्थिती बदलायची तर तुम्ही-आम्ही, प्रत्येक घराने स्त्री सन्मानाची पताका फडकवत ठेवणे गरजेचे आहे आणि प्रथमपासून प्रबोधनाचे काम करणारा गणेशोत्सव ही संधी प्रत्येकाला नक्कीच देईल. या अर्थानेही मला हा गणेशोत्सव महत्त्वाचा वाटतो. हा संपूर्ण काळ आर्थिक उलाढालीचा असतो. या काळात अनेक व्यावसायिकांना, कारागिरांना, व्यापाऱ्यांना पैसे मिळतात. त्यांच्या व्यवहारांना चालना मिळते. मुख्य म्हणजे या सगळ्यामुळे बाजारात पैसा फिरतो. स्वाभाविकच असा उत्सव अनेकांची पोटे भरण्यास, त्यांच्या हाताला काम देण्यास कारक ठरतो. उत्सवाच्या जमेची ही बाजूही सध्या प्रकर्षाने जाणवत आहे. मात्र एकीकडे असे असले, तरी या सगळ्यात, वाढत्या बाजारुपणाच्या लाटेत आपली संस्कृती जपणेही मला तितकेच महत्त्वाचे वाटते. पैसा मिळवायला, व्यापार फुलवायला कोणी आक्षेप घेण्याचे कारण नाही; मात्र आता प्रत्येक माणसाने थोडे थांबून आज समाजाला कशाची गरज आहे, हे पाहावे असे वाटते. अगदी राजकारण्यांपासून सामान्यांपर्यंत सगळ्यांनीच एक क्षण तरी याचा विचार करावा आणि आपण करतो त्या कामातून समाजाला काय मिळणार आहे, याचे अवलोकन करावे. प्रत्येकाने नियुक्त केलेले काम या जाणिवेनिशी, विचारानिशी पार पाडले आणि पूर्ण क्षमतेने, पारदर्शकतेने, सचोटीने आणि संवेदनशीलतेने पूर्ण केले तरी समाजातील नकारात्मक चित्र बदलण्यास फार वेळ लागणार नाही, असे वाटते. प्रत्येकाने सर्वतोपरी उत्तम देण्याचा विचार केला तर सर्व प्रकारची कीड बघता बघता संपून जाईल. यंदा गणेशाने आपल्याला ही सम्यक दृष्टी द्यावी. कारण समाज खालपासून सुधारण्याची मोठी गरज आता निर्माण झाली आहे.

सध्या मन चाळवणाऱ्या अनेक गोष्टी अस्तित्वात आणि प्रत्येकाच्या आवाक्यात आहेत. त्यावर काहीही निर्बंध नाहीत. त्यासाठी काही पावले उचलण्याची गरज यानिमित्ताने व्यक्त करावीशी लागते. यासाठी सरकारकडूनही पावले उचलली जावीत आणि पालकांनीही योग्य ते संस्कार करत मुलांना यापासून दूर ठेवावे. आपल्या पाल्यालाच नव्हे तर सजग आणि सुजाण माणसाने आपल्या संपर्कात येणाऱ्या असमंजस माणसाला हे धडे देण्याची, संस्कारित करण्याची गरज आता ओळखायला हवी. कारण आज अनेकांची नैतिक मूल्ये हरपली आहेत. आपण काय करतो याचे भान हरपले आहे. त्यामुळेच ते परत एकदा रुजवण्याची गरज आहे. गणेशोत्सव त्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. शेवटी ही बुद्धीची देवता आहे. त्यामुळेच यंदा आपण त्याच्याकडे समाजाला चांगली बुद्धी देण्याचे वरदान मागू शकतो. प्रत्येक मतदार योग्य उमेदवाराला मत देण्याची शक्ती त्याच्याकडे मागू शकतो. केवळ बढाया मारणारे लोक आता समाजाला नको आहेत, हे त्याला विनवू शकतो. मुख्य म्हणजे वाढता बाजारुपणा कमी करण्यासाठी कार्यरत होण्याचा निर्धार आपण सगळेच करू शकतो. आज चालते तीच बातमी दिली जाते, छापली जाते आणि पुन्हा पुन्हा दाखवली जाते. पण या सगळ्यात सच्चेपणा आणि इमानाचा बळीही जाऊ शकतो. म्हणूनच रंजकतेचा अट्टहास, दुराग्रह आता तरी दूर होणे गरजेचे आहे. विकते आहे म्हणून नव्हे तर चांगले आहे म्हणून समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न प्रत्येकाने केला तरच आपल्याला अपेक्षित आदर्श आणि खऱ्या अर्थाने प्रगत समाज निर्माण होईल. त्यामुळे गणरायाने आपल्या या सगळ्या भावनांचा विचार करावा आणि समाजाला हे दान देण्यासाठी शक्ती द्यावी हीच कामना.

*(लेखिका सुप्रसिद्ध गायिका आहेत)*

## रविवारची पत्रे

### काँग्रेसच्या अपयशाचा आढावा

भारतीय जनता पक्ष राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाच्या सातत्यपूर्ण अपयशांची यादी मांडते. राहुल गांधी यांच्या निर्णयक्षमतेवर आणि राजकीय नेतृत्वावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत.

**राजकीय वाटचाल :** राहुल गांधी यांनी २००४ साली अमेठी मतदारसंघातून पहिल्यांदा लोकसभा निवडणूक लढवली आणि विजयी झाले. मात्र, त्यानंतरच्या काळात त्यांच्या नेतृत्वाने काँग्रेसला कोणताही उल्लेखनीय फायदा झाला नाही. त्यांचे राजकीय निर्णय व रणनीती यांची परिणामकारकता प्रश्नचिन्हांत राहिली.

**भट्टा-परसोल घटना :** २०११ साली उत्तरप्रदेशातील भट्टा-परसोल गावातील घटनांनंतर राहुल गांधी यांनी शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ भूमिका घेतली. तथापि, त्यांच्या या दौऱ्याचा शेतकऱ्यांच्या समस्यांवर कुठलाही ठोस परिणाम झाला नाही. त्यांची प्रतिमा एक प्रभावहीन नेता म्हणून उभी राहिली.

**अध्यादेश प्रकरण :** २०१३ मध्ये राहुल गांधी यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील सरकारने तयार केलेल्या अध्यादेशाची प्रत पत्रकार परिषदेत फाडली. त्यांच्या या कृतीमुळे पक्षातील अंतर्गत असंतोष वाढला.

**दारुण पराभव :** २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ ४४ जागांवर समाधान मानावे लागले. काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपदही मिळवता आले नाही; ज्यामुळे त्यांचे नेतृत्व अधिकच विवादास्पद ठरले. त्यांच्या असमर्थ नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाला ऐतिहासिक पराभवाला सामोरे जावे लागले.

**काँग्रेस अध्यक्षपदाचा स्वीकार :** २०१७ मध्ये सोनिया गांधी यांनी दीर्घकाळानंतर काँग्रेसच्या अध्यक्षपदाची धुरा राहुल गांधी यांच्याकडे सोपवली. मात्र, त्यांच्या नेतृत्वाखाली पक्षाला काहीच भरीव यश मिळाले नाही. काँग्रेसच्या जनाधारात घट झाली आणि पक्षाची स्थिती कमजोर झाली.

**आघाडीचे अपयश :** २०१७ मध्ये उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांच्यासोबत आघाडी केली. तथापि, या युतीमुळे काँग्रेसला अपेक्षित यश मिळाले नाही. युतीचा फायदा समाजवादी पक्षालाच झाला.

**चौकीदार चोर है आणि राफेल वाद :** २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर राफेल करारात भ्रष्टाचाराचे आरोप करत 'चौकीदार चोर है' हा नारा दिला. मात्र, काँग्रेसला कोणताही फायदा झाला नाही. उलट, काँग्रेसला फक्त ५२ जागा मिळाल्या; ज्यामुळे पुन्हा एकदा काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपद गमवावे लागले. २०१९ च्या लोकसभा अधिवेशनात राहुल गांधी यांचे गैरवर्तन अनेकदा चर्चेत आले.

**लोकसभेची उमेदवारी रद्द होण्याचे कारण :** २०२४ साली राहुल गांधी यांची लोकसभेची उमेदवारी एका मानहानीच्या खटल्यात दोषी ठरल्यामुळे रद्द करण्यात आली. गांधी यांनी काँग्रेसची आर्थिक परिस्थिती अत्यंत दयनीय असल्याचे सांगितले होते. प्रचारासाठी पुरेसा निधी नसल्याचे जाहीर केले होते. तरीही, काँग्रेसला केवळ ९६ जागा मिळाल्या; जे त्यांच्या अपयशी नेतृत्वाचे आणि कमजोर पक्ष संघटनेचे प्रतीक आहे.

**निष्कर्ष :** राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने सातत्याने अपयशाचा सामना केला आहे. त्यांच्या असमर्थ नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाच्या जनाधारात घट झाली आणि पक्षाच्या अंतर्गत संघटनेतही गंभीर असंतोष आहे. भाजपा राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर कठोर टीका करत आहे आणि भारतीय जनतेला काँग्रेसच्या अपयशाची जाणीव करून देत आहे.

**राजेंद्र सायरे**/नागपूर

### बेधुंद कारचालकांना वठणीवर आणा

नागपूरच्या रस्त्यांवर सध्या बेधुंद कारचालकांनी आतंक माजवून ठेवल्याचे दिसत आहे. कारचालकांनी दुचाकी किंवा इतर छोट्या वाहनांना धडक देण्याच्या घटना दररोज घडत आहेत. या अपघातांमध्ये कुणाचा जीव जातो तर कुणी आयुष्यभरासाठी अपंग होऊन बसतो, कोणाची रोजी-रोटी ठप्प होते. कशीही कार चालवणे, कुठेही थांबणे, सतत लेन बदलत राहणे, टपऱ्यांवरून काहीही खाण्यासाठी अगदी रस्त्यावरच कार थांबवून कारमध्ये बसून खाणे, सिग्नलवर झेब्रा क्रॉसिंगच्या पुढे जाऊन थांबणे, वर्दळीच्या रस्त्यावर अर्धाअधिक रस्ता घेरून कार पार्क करणे असा मनमानीपणा हे बेमुर्वत कारचालक करताना दिसून येतात. सिग्नलवर डावीकडे थोडी जागा दुचाकी आणि इतर लहान वाहनांसाठी सोडून कार उभी करायचा नियम आहे, परंतु हे कारचालक एका बाजूला एक अशा एका रांगेत चार-पाच कार उभ्या करतात. त्यामुळे दुचाकी चालकांनी आपले वाहन कुठे उभे करावे हा प्रश्न पडतो. सिग्नल सुरू होताच हे कारचालक आपले वाहन एकदम वेगात दामटतात आणि दुचाकींना कट मारून पुढे जायला पाहतात. दुचाकी आणि इतर लहान वाहनांना अगदी कचराच समजतात. आम्हालाच रस्त्यावरून जायचा हक्क आहे अशी यांची प्रवृत्ती असते. रात्रीच्या वेळेस तर या कारचालकांच्या अंगात कोणते भूत संचारते माहीत नाही. रात्रीला अनेक कॉलेजमध्ये शिकणारी पोरं आपल्या बा



ची कार घेऊन सोबत मित्रमंडळींना घेऊन मौजमजा करायला निघतात आणि बेधुंदपणे कार चालवतात. अशा रईसांच्या कार्ट्यांनी अनेक निरपराधी लोकांचा जीव घेण्याच्या अनेक घटना आतापर्यंत घडल्या आहेत. रात्रीच्या वेळेस अनेक कारचालक दारू ढोसून कार चालवतात. नशेत असल्यामुळे आपण कशी आणि किती वेगात कार चालवत आहोत, याचं त्यांना अजिबात भान राहात नाही. सद्यस्थितीत प्रत्येक घरी कार आहे आणि प्रत्येक घरातून दोन-चार ड्रायव्हर तयार होत आहेत. यांना फक्त कार चालवता येते; रहदारीचे नियम, कायदे याची माहिती नसते. कारचालकांमध्ये ट्राफिक सेन्स दिसून येत नाही. त्यामुळे आता अशा बेधुंद कारचालकांना वठणीवर आणणे गरजेचे असून वाहतूक विभागाने उपाययोजना कराव्यात. शहरात सीसीटीव्ही लागले आहेत; त्या माध्यमातून अशा वाहनचालकांवर लक्ष ठेवून त्यांना दंडित केले पाहिजे. प्रत्येक मुख्य रस्त्यावर स्पीडगनद्वारे गतीवर लक्ष ठेवले पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रात्री ८ ते पहाटे २ वाजेपर्यंत प्रत्येक मुख्य चौकात ड्रंकन ड्राईव्ह मोहीम सुरू ठेवली पाहिजे. याविषयी दोन महिन्यांपूर्वी मी डिसीपी ट्रॅफिक आणि पोलिस आयुक्तांना ई-मेल केले होते, परंतु त्यांनी काहीच पावले उचललेली दिसत नाही. परिवहन मंत्र्यांनी तरी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

**संजीव हरिदास हेडाऊ**/९३७०१६९५८२

### नेत्रदान जनजागरण : काही सूचना

दरवर्षी २५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबरदरम्यान नेत्रदान जनजागरण पंधरवडा साजरा करण्यात येतो. यंदा हे ३९ वे वर्ष आहे. इतक्या वर्षांपासून सुरू असणाऱ्या या मोहिमेची फलश्रुती म्हणावी तेवढी प्रभावी होताना दिसत नाही. दृष्टिबाधितांची संख्या (ज्यांना नेत्रदानामुळे दृष्टी प्राप्त होऊ शकण्याची शक्यता असते) आणि देशात दररोज मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या (ज्यांच्या मरणोत्तर नेत्रदानामुळे अशा दृष्टिबाधितांना दृष्टी मिळू शकते) यांची तफावत वाढतच जात आहे. याचे कारण मुख्यत्वे मरणोत्तर नेत्रदानाबद्दलची उदासीनता. सुज्ञ व्यक्तीला नेत्रदानाचे महत्त्व माहीत नाही असे नाही; परंतु पुढाकार घेऊन हे कार्य यशस्वी करण्याबद्दल त्यांची मानसिकता अजूनही तयार नाही. विविध संघटना, सरकारी, खाजगी, निमसरकारी, एनजीओ इ. जे दृष्टिबाधितांच्या कल्याणासाठी कार्यरत आहे, ते आपापल्या परीने दरवर्षी या पंधरवड्यादरम्यान जनजागरणासाठी विविध उपक्रमांद्वारे, शिबिरांद्वारे मोफत नेत्र तपासणी, नेत्रविकार व नेत्रदानासंबंधी सामान्य जनतेला प्रेरित करतात. परंतु त्याचा फारसा परिणाम होताना दिसत नाही. प्रोत्साहन, अनुदान किंवा प्रलोभन दिल्याशिवाय कोणी पुढे येत नाही. दृष्टिहिनांना दृष्टी मिळण्यास केवळ मरणोत्तर नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या मिळालेल्या कॉर्नियाशिवाय दुसरा उपाय नाहीच. त्यामुळे देशात दृष्टिबाधित लोकांची वाढती संख्या बघता सरकारने पुढाकार घेऊन विशेष योजना/उपाय करणे गरजेचे आहे. मरणोत्तर नेत्रदान प्रक्रिया अत्यंत सोपी व नि:शुल्क आहे. मरणोत्तर नेत्रदान केलेल्या व्यक्तीच्या परिवाराला सरकारतर्फे किंवा स्थानीय प्रशासनाद्वारे काही प्रोत्साहन राशी किंवा सवलती दिल्या तर काही प्रमाणात याला गती मिळेल, अशी आशा आहे. नागपुरात काही संस्था जसे 'सक्षम' (समदृष्टी क्षमता विकास एवं अनुसंधान मंडल) तसेच माधव नेत्रालय नेत्रदानासाठी प्रभावीपणे जनजागरण करीत आहेत. परंतु, या जनजागरणाची फलश्रुती प्रत्यक्ष नेत्रदानाची संख्या वाढेपर्यंत होणार नाही. नेत्रदान संकल्प करून स्वस्थ बसणे योग्य नाही. प्रत्येक परिवारांनी मृत व्यक्तीच्या संकल्पाचा आदर करावयास हवा व या पवित्र कार्यास हात भार लावावा. संकल्प केला नसल्यासदेखील मृत व्यक्तीच्या परिवाराच्या संमतीने नेत्रदान करता येते. चला तर या जनजागरण पंधरवड्याच्या निमित्ताने आपण या सर्वश्रेष्ठ दानाला एक चळवळीचे रूप देऊ व आपल्या परिवारात, परिसरात, नातेवाईक, आप्तेष्टांकडे कोणाचा मृत्यू झाल्यास त्या व्यक्तीचे नेत्रदान अवश्य करू, असा संकल्प करू या. बहुदा मृत व्यक्तीच्या नेत्रदानाकरिता कुठे व कसा संपर्क करावा याची माहिती नसणे, हे देखील या उदासीनतेचे कारण असू शकते. म्हणून संपर्क क्रमांक देत आहे. ०७१२-६७८५२०० व मोबाईल ९८२२२०८३८१ येथे संपर्क केल्यास सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यात येतील; ज्याला काहीही शुल्क लागत नाही. (मृत्यूनंतर सहा तासांच्या आणि डॉक्टरकडून मृत्यू प्रमाणपत्र आवश्यक आहे.) ही जागरूकता निरंतर सुरू ठेवण्याचा संकल्प करूया व आपले सामाजिक दायित्व पार पाडूया!

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

### आरक्षण वर्गवारीचा तिढा कायम?

'मोठा मासा लहान माश्यांना खातो' हे आरक्षणाचे मूळ आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने बहुमताने सर्व प्रकारच्या आरक्षणाला श्रेणी लावण्याचे सुचविले आहे. यावरून सधन आरक्षणार्थींनी आक्रमक भूमिका घेऊन केंद्र सरकार विरोधात दंड थोपटले. सुप्रीम कोर्टाने हा निर्णय अचानक घेतलेला नाही. यावर बरेच विचारमंथन झाले आहे. मग ओबीसींना असणाऱ्या आरक्षणाला का श्रेणी लावली गेली? कारण ओबीसी कायद्यातच तशी तरतूद केलेली आहे, असे सांगितले जाते आहे. असे असेल तर हा त्यांच्यावर अन्यायच नाही का? कुणी कितीही प्रयत्न केले तरीही भारतीय संविधान धोक्यात कधीच येऊ शकत नाही, हे सर्वजण जाणून आहेत. विरोधकांना केवळ आपली राजकीय पोळी शेकून घ्यायची असते. आरक्षणाची निर्मिती कशी झाली? दोन बैलांच्या झुंजीचे सोदाहरण यासाठी नेहमी पुढे केले जाते. यातील एक बैल हा बलवान असतो तर दुसरा हा कमजोर असतो. कमजोर बैलाचा स्पर्धेत कसा टिकाव लागणार; परंतु स्पर्धा ही नेहमीच दोन तुल्यबळ प्रतिस्पर्धींमध्ये होत असते. एक कमी एक जास्त असे नसते. मग तिथे भेदभाव केल्याचा आरोप करण्यास जागा असते. कुठल्याही स्पर्धेत डावपेचाला, कौशल्याला अधिक महत्त्व प्राप्त असते. हीच खरी वास्तविकता आहे. कमजोर प्रतिस्पर्ध्याला चांगली खुराक देऊन स्पर्धेचे नियम, डावपेच शिकविले गेले तर तो बलवान ठरू शकतो. मात्र, एखाद्याला संधी मिळूनही तो बलवान ठरत नसेल, त्याचा स्पर्धेत टिकाव लागत नसेल तर दोष कुणाचा? तसेच आरक्षणाचे आहे. आरक्षण हे कुणीही बंद करूच शकत नाही. आरक्षणाची विभागणी ही सामान्यत: तीन भागांत केली जाते. सामाजिकदृष्ट्या मागासलेले, शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेले. यात आणखी एकाची भर पडलेली आहे. ती म्हणजे वैचारिकदृष्ट्यांची. या गटात आपली सर्वांगीण प्रगती झाल्यानंतरही आपण मानसिकदृष्ट्या यातून बाहेर न पडल्या कारणाने स्वतःला मागासलेलोच समजतो आहे. यात स्वतःचा व कुटुंबातील लोकांचा स्वार्थ हा दडलेला आहे, याची कबुली आपण देऊ शकत नाही. सोदाहरण द्यायचे झाल्यास एखाद्या कुटुंबातील बहुतांश लोक हे उच्चशिक्षित असून त्यांची वर्णी ही चांगल्या पगार व मानाच्या पदावर लागलेली आहे. मात्र त्यांच्याच कुटुंबातील इतर कुणाचीही परिस्थिती बेताचीच असेल; ते सर्वप्रकारची पात्रता अंगी असताना आरक्षणाचा लाभ उचलू पाहात असतील तर त्यांच्यासाठी कुणीतरी आरक्षणास पात्र असणाऱ्या शिक्षित व्यक्तीने आरक्षणाचा त्याग करणे अपेक्षित आहे. तेव्हाच खऱ्या गरजवंताला न्याय मिळू शकतो, असे सुप्रीम कोर्टाचे मत पडते आहे. याखातर तरी आपण सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाचा मान ठेवून आपल्यापेक्षा कमजोर लोकांना संधी प्राप्त करून देण्याची भूमिका स्वीकारू या. ही आपल्याच समाजातील लोकांच्या हिताची बाब ठरणार आहे. सर्वांनाच समान संधी मिळाली पाहिजे याचा आग्रह धरला आहे. सुप्रीम कोर्ट अधिकार काढून घेऊ इच्छित नाही तर सबलांनी मोठ्या भावाची भूमिका स्वीकारावी, एवढेच मागणे केले आहे. तर मग पहा एकदा मोठ्या मनाने स्वार्थरहित विचार करून! पटते का ते?

**मिलिंद गड्डमवार**/९५११२१५२००

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जळकोटसह परिसरात पावसाची संततधार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१ सप्टेंबर -**

गेल्या काही दिवसापासून दडी मारलेल्या पावसाने हजेरी लावल्याने शेतकरी राजा सुखावला आहे. जळकोट व परिसरात पावसाची शनिवारी रात्रीपासून संततधार सुरू आहे. पोळा सणावर पावसाचे सावट आहे.

सध्या श्रावण महिन्याचा शेवटचा कालावधी सुरू आहे. श्रावण महिन्यात पावसाने काही प्रमाणात हजेरी लावल्यानंतर, श्रावणाच्या शेवटच्या टप्प्यात पावसाने परत एकदा तोंड उघडले आहे. शनिवारी रात्री दहा वाजल्यापासून पावसाची संततधार सुरू आहे. ओढे, नाले तुडुंब भरून वाहत आहेत. गावागावातील साठवण तलावात पाणी साचत आहे. यंदा सोयाबीन, तूर, मूग, उडीद, बाजरी, ज्वारी आदि खरीप पीके जोमात आहेत.

सध्या शेतकरी वर्ग उडीद व मूग काढण्याच्या कामात व्यस्त आहेत. काही प्रमाणात उडीद व मुगाच्या राशी झाल्या आहेत. या पावसामुळे उडीद व मूग पिकाला फटका बसण्याची शक्यता आहे. काही शेतकऱ्यांच्या उडीद व मुगाच्या राशी रानावर अडकल्या आहेत. त्यात शेवटचा श्रावण सोमवार व बैलपोळा सण असल्याने या सणावर पावसाचे सावट आहे.

जळकोट, हंगरगा, नंदगाव, सिंदगाव, बोरगाव, कुंसावळी, बोळेगाव, आलूर, अचलेर, सलगरा, घोळसगाव, आष्टाकासार, लोहगाव, किलज, होर्टी, जेवळी, येणेगुर, दाळिंब, मुरूम, वागदरी, गुजनूर, येडोळा आदि भागात सर्वदूर पाऊस कोसळत आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...




### ट्रक-कारचा अपघात; एकजण ठार

**येरमाळा, दि.१ सप्टेंबर -**

सोलापुर-धुळे महामार्गावरील चोराखळी नजीक धाराशिव कारखान्याजवळ गाडीला ओव्हरटेक करताना ट्रक व कारच्या झालेल्या अपघातामध्ये एक जण जागीच ठार झाल्याची घटना दि.३१ रोजी पहाटे सहा वाजेच्या सुमारास घडली आहे. धाराशिव साखर कारखान्यासमोरील उड्डानपुलावरुन ट्रक आणि कार हे दोन्ही वाहने येरमाळ्याकडे येत असताना उड्डानपुलावरुन ओव्हरटेक करीत असताना ट्रकचालकाचा ताबा सुटल्याने ट्रकने कारला पाठीमागुन जोराची धडक दिल्याने कारमधील रणजित अरुण कागदे हे जागीच ठार झाले आहेत. सदरील घटनेतील ट्रकचालक अपघात करुन फरार झाला याबाबत पुढील तपास येरमाळा पोलिस करीत आहेत.



### सीता स्वयंवर विवाह सोहळा संपन्न

**इटकळ, दि.१ सप्टेंबर -**

तुळजापुर तालुक्यांतील येवती येथे श्री संत एकनाथ महाराज लिखित भावार्थ रामायण ग्रंथातील सीता स्वयंवर कार्यक्रमांचे शनिवार दि.३१ ऑगस्ट रोजी हनुमान मंदिरात आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सात वाजता १ ते ४८ ओव्यांचे वाचन व निरुपण करण्यात आले. त्यानंतर श्रीराम लक्ष्मण भरत शत्रुघ्न व सीता उर्मिला मांडवी श्रुतकीर्ती यांच्या विवाह प्रसंगी मंगलअष्टका म्हणून अक्षदा टाकण्यात आल्या. त्यानंतर उपस्थित सर्व राम भक्तानां महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.



### सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी

**तेर, दि.१ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी धोंडीराम कस्तुरे, महादेव कचरे, अमोल कस्तुरे, लक्ष्मण राऊत, अनिल कचरे, हरिदास झांबरे, सुरेश माने, काका राऊत, बालाजी राऊत, दत्ता सुरवसे, बालाजी सम्रत, प्रशांत सूर्यवंशी, धनंजय सूर्यवंशी, जनकराज जगदाळे, निरंजन राऊत, गौरव कचरे, रामदास झांबरे, वैजनाथ राऊत, ओम सूर्यवंशी, सोमनाथ यादव, प्रेम राऊत, सचिन पवार आदी उपस्थित होते.



### येरमाळ्यात शांतता कमिटीची बैठक

**येरमाळा, दि.१ सप्टेंबर -**

येरमाळा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या सर्व गणेश मंडळांच्या पदाधिकारी आणि पोलीस पाटलांची येणाऱ्या गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद च्या अनुषंगाने शांतता कमिटीची बैठक येरमाळा पोलीस ठाण्यामध्ये घेण्यात आली. येरमाळा पोलीस ठाण्यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली आगामी काळात होणाऱ्या गणेश उत्सव व ईद-ए मिलादच्या अनुषंगाने शांतता बैठक घेण्यात आली. सदर बैठकीसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार, सपोनी. महेश क्षीरसागर, पोलीस पाटील, गणेश मंडळाचे पदाधिकारी, व येरमाळा येथील डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी शांतता, कमिटीचे सदस्य हजर होते.



### गुजनूर येथे साठे जयंती साजरी

**जळकोट, दि.१ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील गुजनूर येथे आरोग्य शिबीरासह विविध उपक्रमाने साहित्य सम्राट, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. भव्य मिरवणूकीने जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली. साहित्यरत्न अण्णाभाऊ भाऊ साठे जयंती उत्सव कमिटी, गुजनूर व जि.प. प्राथमिक आरोग्य केंद्र, नळदुर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त गुजनूर येथ मोफत आरोग्य तपासणी, प्रथमोपचार व आरोग्य सल्ला शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शेवटी साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची गावातून भव्य मिरवणूक काढून जयंती उत्सवाची सांगता करण्यात आली.

## माजी आ. सुजितसिंह ठाकूर यांना विधान परिषदेतील उत्कृष्ट भाषण पुरस्कार

**राष्ट्रपतींच्या हस्ते होणार मुंबईत पुरस्कार वितरण...**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१ सप्टेंबर -**

भारतीय जनता पार्टीचे विधानपरिषदेचे माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांची राष्ट्रकुल संसदीय मंडळा मार्फत विधानपरिषदेतील भाषणाबद्दल उत्कृष्ट भाषण या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते मंगळवार दि.३ सप्टेंबर रोजी दु. ३.३० वाजता मध्यवर्ती सभागृह, विधान भवन, मुंबई येथे संपन्न होणार आहे.

माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांना विधानमंडळ कार्यालयातून दूरध्वनी व ईमेल करून या पुरस्काराबद्दल कळविण्यात आले आहे. या समारंभास महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु तसेच महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, विधानपरिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती नीलमताई गोऱ्हे व विधानसभा उपसभापती नरहरी झिरवळ हे उपस्थित राहणार आहेत.



माजी आ. सुजितसिंह ठाकूर यांना सन २०१८-१९ करिता महाराष्ट्र विधानपरिषद उत्कृष्ट भाषण पुरस्कार देण्यात येत असून ठाकूर यांनी विधीमंडळात मराठवाडा आणि धाराशिव जिल्ह्यात सततचा पडणारा दुष्काळ, पाणी टंचाई, मराठवाड्याचे हक्काचे २३.६६ टीएमसी कृष्णा खोऱ्यातील पाणी, शेतकरी कर्ज माफी, जलयुक्त शिवार, शेतीपंपाचा वीज प्रश्न, मराठवाड्याचे मागासलेपण, दरडोई कमी असलेले उत्पन्न, धाराशिव येथील वैद्यकीय महाविद्यालय आदी राज्यातील जनतेच्या जिव्हाळ्याचे अनेक विषय प्रभावीपणे सभागृहात मांडले होते.

राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्यावतीने माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांना उत्कृष्ट भाषण हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सुजितसिंह ठाकूर यांचे परंड्यासह सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## धाराशिवसह जिल्ह्यात सर्वदूर पावसाची हजेरी

**जिल्ह्यात रविवार सकाळ पर्यंत १५ मिलिमीटर तर १ सप्टेंबर पर्यंत ५५१ मिलिमीटर पाऊस...**

**तभा वृत्तसेवा / देविदास पाठक**
**धाराशिव, दि.१ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील आठ तालुक्यात ३१ ऑगस्ट शनिवारपासून पावसाची संततधार सुरू असून एक सप्टेंबर सकाळपर्यंत जिल्ह्यात पंधरा मिलिमीटर पाऊस झाला आहे.जिल्ह्यात आत्तापर्यंत ५५१ मिलिमीटर पाऊस झाला असून आज सोमवारी २ सप्टेंबर रोजी सुद्धा पाऊस होणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान केंद्र कुलाबा,मुंबई वेधशाळेने व्यक्त केला आहे. या पावसामुळे सोयाबीन पिकाचे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात असून जिल्ह्यातील ४० सिंचन प्रकल्प पूर्ण भरले असून यात सर्वाधिक चार मध्यम प्रकल्प परंडा तालुक्यातील शंभर टक्के भरले आहेत तर उमरगा लोहारा तालुक्यात अद्याप एकही मध्यम प्रकल्प भरलेला नाही.

> जिल्ह्यात धाराशिव तालुक्यात ५६८.३ मिलिमीटर, तुळजापूर तालुक्यात ५३९.७ मिलिमीटर, भूम तालुक्यात ४८३.८ मिलीमीटर, कळंब तालुक्यात ६१६.९ मिलिमीटर, उमरगा तालुक्यात ५९५.७ मिलिमीटर, लोहारा तालुक्यात ५०६ मिलिमीटर असा सर्व मिळून सरासरी ५५१ मिलिमीटर पाऊस झाला आहे.

धाराशिव तालुक्यातील तीन तुळजापूर तालुक्यातील तीन भूम तालुक्यातील तीन कळंब तालुक्यातील एक आणि उमरगा तालुक्यातील तीन मध्यम प्रकल्प या पावसामुळे शंभर टक्के भरले आहेत. धाराशिव तालुक्यातील २१ तुळजापूर तालुक्यातील ६८ परंडा तालुक्यातील दहा भूम तालुक्यातील सोळा कळंब तालुक्यातील सोळा उमरगा तालुक्यातील ३५ लोहारा तालुक्यातील आठ आणि वाशी तालुक्यातील १४ लघु आणि साठवण तलाव या पावसामुळे भरल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे. धाराशिव जिल्ह्यात शनिवारी ३१ ऑगस्ट संध्याकाळपासून सुरू झालेली पावसाची रिमझिम रविवारी दिवसभरही सुरू होती. यादरम्यान रविवारी सकाळपर्यंत धाराशिव जिल्ह्यातील आठही तालुक्यात १५ मिलिमीटर पाऊस झाला आहे. यात सर्वाधिक ५३ मिलिमीटर पाऊस उमरगा, लोहारा तालुक्यात झाला असून तुळजापूर तालुक्यात तेरा पूर्णांक पाच मिलिमीटर धाराशिव तालुक्यात अकरा पॉईंट एक मिलीमीटर कळंब तालुक्यात तीन पूर्णांक पाच मिलिमीटर वाशी तालुक्यात ०.९ मिलीमीटर तर भूम आणि परंडा तालुक्यात ०.२ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला आहे.

धाराशिव जिल्ह्यात जून पासून एक सप्टेंबर पर्यंत ५५१ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला आहे. यात सर्वाधिक ६५९.९ मिलिमीटर पाऊस वाशी तालुक्यात तर सर्वात कमी ४४७.९ मिलिमीटर पाऊस परांडा तालुक्यात नोंदवला गेला आहे.

## जनावरांची अवैध वाहतुक करणाऱ्या टेम्पोला अपघात; १० वासरांचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१ सप्टेंबर -**

सोलापुर धुळे महामार्गावरील तेरखेड्याजवळ लहान वासरे घेऊन जाणारा पिकअप पलटी होऊन झालेल्या अपघातामध्ये १० वासरे मयत तर ३५ जखमी झाल्याची घटना शनिवारी (ता.३१) सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घडली.

याबाबत पोलिसाकडून मिळालेली माहीती अशी की, सोलापुर- धुळे महामार्गावरील तेरखेडा येथिल हॉटेल आरुषजवळ बिडकडुन येरमाळ्याकडे जनावराची वासरे घेऊन जाणारा मालवाहतुक पिकअप (क्र.एम.एच.४२.एम ६४०९) चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने गाडी



दुभाजकावर जोराची धडक देऊन पलटी झाल्याने गाडीतील १० वासरे मयत झाली तर ३५ वासरे जखमी झाली आहेत.

या घटनेची माहीती मिळताच येरमाळा पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले परंतु चालक व इतर काही जण फरार झाले असुन याप्रकरणी पुढील तपास येरमाळा पोलिस करीत आहेत.

## अतिवृष्टीने पिकांचे नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत विमा कंपनीकडे करा तक्रार : रितापुरे

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ सप्टेंबर -**

उमरगा तालुक्यात रविवारी (दि.१) सध्याकाळपर्यंत संपलेल्या मागील २४ तासात सरासरी ५३.१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, ५ महसूल मंडळांमध्ये पाऊस झाला असून त्यापाठोपाठ उमरगा व दांळिब मंडळात अनुक्रमे ६१ व ९४.८ मिमी इतक्या मोठ्या पावसाची नोंद झाली आहे.

**उमरगा तालुक्यात सरासरी ५३ मिमी पावसाची नोंद...**

आता पर्यंत सरासरी ५३.१ मि.मि. पाऊस पडला आहे. तालुक्यांत.रविवारी (दि.१) संध्याकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय महसूल मंडळ सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून उमरगा ६१, डाळिंब ९४.८, नारंगवाडी २१.८ मुळज ३३.५ मुरुम ५४.३ पर्यंत सरासरी तालुक्यांत ५३.१ मि.मि. झालेल्या पावसाची नोंद झाली आहे.

३१ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी उमरगा तालुक्यामध्ये काही महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याचे दिसून येते. अतिवृष्टीमुळे परिसरातील पिकांचे काही नुकसान झाले असल्यास शेतकऱ्यांनी विमा कंपनीस ७२ तासाच्या आत पीक नुकसानीची पूर्वसूचना क्रॉप इन्शुरन्स या मोबाईल अॅपद्वारे द्यावी तसेच याबाबत काही अडचण असल्यास विमा कंपनीची शेतकऱ्यांसाठी विकसित केलेले कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन क्रमांक १४ ४४७ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी डी.बी रितापुरे यांनी केले.

## मुलांनी मातीपासून बनवल्या सुंदर कलाकृती

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ सप्टेंबर -**

धाराशिव शहरातील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये 'बैलपोळा' या दिनाचे औचित्य साधून इयत्ता सहावी विभागाने माती पासून बैलांची प्रतिकृती तयार करण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये इयत्ता सहावीच्या वर्गातून तब्बल १५० मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या सर्व विद्यार्थ्यांनी मातीपासून अत्यंत आकर्षक, रेखीव अशा बैल जोडी तयार केल्या.

विद्यार्थ्यांनी मातीपासून बनविलेल्या प्रतिकृती पाहून प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार नन्नवरे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, निखीलकुमार गोरे यांनी व मान्यवरांनी सर्व मुला-मुलींचे कौतुक केले.

## उमरग्यात डेंग्युचे थैमान : दोन मुलांचा मृत्यु




> शहरात पालिका आरोग्य विभागाकडून मिथिनॉल पावडरची धुर फवारणी, गटारीवर प्रायाझुल पावडर, पाण्यात अॅबेटिंग टाकण्यात येत आहे. ठिक ठिकाणी गटारी च्या पाण्याचा निचरा करुन देण्याच्या सुचना दिल्या आहेत. सर्वत्र साफसफाई करण्यात येत आहे.
>
> **-तुळशीदास वराडे,** आरोग्य निरिक्षक, नगरपरिषद

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१ सप्टेंबर -**

उमरगा शहरामध्ये सध्या साथीच्या रोगांनी थैमान घातले आहे. रुग्ण थंडी, ताप, डोकेदुखी, अंगदुखी, सर्दी खोकला या विकाराने त्रस्त आहेत. मागील चार दिवसांमध्ये डेंग्यू सदृश तापाने दोन वेगवेगळ्या मुलांचा सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

शहरातील आरोग्य नगर परिसरातील भागात शनिवारी सायंकाळी धुराची फवारणी करीत मच्छरांचा नायनाट करण्यासाठी पालिकेने कंबर कसली आहे. दोन युवकांचा मृत्यू झाल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. याबाबत नगरपालिका आरोग्य विभागाकडून



शहरातील इतर भागात कोणत्याही प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे.शहरातील मदनानंद कॉलनी येथील ओम शिवाजी सांळुके (वय १९) येथील तर पतंगे रोड परिसरातील सत्यजीत हणमंत देशमुख (वय. १२) यालाही डेंग्यू सदृश्य लक्षणे दिसताच त्याला शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सत्यजित यालाही सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान शनिवारी, (दि ३१) सत्यजीत याचा मृत्यू झाला.

चार दिवसांत दोन मुलांचा डेंग्यू सदृश तापामुळे मृत्यु झाल्याने खळबळ उडाली आहे.

## निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेची दुरुस्ती दृष्टीपथात ११३ कोटींच्या दुरूस्तीस प्रशासकीय मान्यता मिळणार



**आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१ सप्टेंबर -**

२३ गावातील शेतकर्यांसाठी अतिशय महत्वपूर्ण असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेची दुरुस्ती आता दृष्टीपथात आहे. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी भगीरथ प्रयत्नाने केलेला हा प्रकल्प पुन:कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपली आहे. ठाकरे सरकारच्या भूमिकेमुळे सुरुवातीच्या अडीच वर्षात या प्रकल्पाच्या दुरूस्ती बाबत काहीच हालचाल झाली नाही. मात्र आता ११३ कोटी रूपयांच्या दुरूस्ती प्रस्तावास तांत्रिक मान्यता मिळाली आहे. लवकरच अशक्यप्राय वाटणाऱ्या या कामास प्रशासकीय मान्यताही मिळेल, असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे. धाराशिव तालुक्यातील करजखेडा चौरस्त्यावर परिसरातील शेतकऱ्यांसोबत आ. पाटील संवाद साधत होते.

या महत्वपूर्ण योजनेच्या दुरुस्तीसाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांना आपण स्वत: भेटून निधी उपलब्ध करून देण्यासंबंधी नोव्हेंबर २०२२ मध्ये विनंती केली होती. त्यानुसार उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी जलसंपदा विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. पाच टप्याची असणारी ही योजना गेली अनेक वर्षे बंद असल्याने स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी या तिन्ही विभागाची दुरुस्ती आवश्यक होती. या तिन्ही विभागांकडून अंदाजपत्रक तयार करून घेणे मोठे जिकिरीचे काम होते.

अनेक त्रुटींची पूर्तता करून या तिन्ही विभागाच्या समन्वयाने निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या रु.११३ कोटी अंदाजपत्रकीय किमतीच्या कामास तांत्रिक मान्यता मिळवून घेतली आहे.

कोणत्याही महामंडळाला प्रकल्प दुरूस्तीसाठी एकूण तरतुदीच्या १० टक्के निधी खर्च करता येतो. निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरूस्तीसाठी ११३ कोटी रूपयांची आवश्यकता आहे. त्यामुळे या प्रस्तावास खास बाब म्हणून मंजुरी मिळवून घेण्यासाठी आपला पाठपुरावा सुरू असल्याचे आमदार पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. अशक्यप्राय वाटणारी कामे देखील आपण मिळून यापूर्वीही केलेली असून हे काम देखील पूर्ण करण्याची आपली सर्वांची जबाबदारी असल्याचे ते म्हणाले.

यावेळी भाजपा जिल्हा संयोजक नेताजी पाटील, तालुकाध्यक्ष राजाभाऊ पाटील, अहमद पठाण यांच्यासह बहुसंख्येने परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

अर्थ सहकारेण कल्याणम् ।

**जनसेवा नागरी सहकारी बँक मर्यादित, भूम**

स.नं. २२० कुसुमनगर, भूम. ता. भूम, जि. धाराशिव (०२४७८) २७२०२५

| रजि. नं. | रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया |
|---|---|
| OSM/BNK/(0) 110/97/1998 | ला.नं. UBD.MH1574-P |

**सन २०२३-२०२४ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

जनसेवा नागरी सहकारी बँक मर्यादित, भूम ची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. १६/९/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता सरस्वती प्राथमिक विद्यालय सभागृह, शाळू गल्ली, भूम येथे खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी बँकेचे अध्यक्ष श्री. श्रीराम नारायणराव मुळे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**✻ सभेपुढील विषय ✻**

**१.** २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन ती क्षमापित करणे., **२.** मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. १७/०९/२०२३ चे इतिवृत्त वाचून कायम करणे. **३.** दिनांक ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक मंजूर करणे., **४.** सन २०२३-२४ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे., **५.** सन २०२४-२५ चे अंदाज पत्रकांस मान्यता देणे., **६.** दि. ३१/३/२०२४ अखेरच्या वैधानिक लेखा परिक्षण अहवालाची नोंद घेणे., **७.** सन २०२४-२५ करिता मा. संचालक मंडळाने केलेल्या समावर्ती लेखा परिक्षकाच्या नेमणूकीस मान्यता देणे व मेहनताना ठरवणे., **८.** सन २०२४-२५ करिता मा. संचालक मंडळाने प्रस्ताव दिलेल्या व रिझर्व्ह बँकेने मंजूरी दिलेल्या वैधानिक लेखा परिक्षकाचे नेमणुकीस मान्यता देणे., **९.** सन २०२३-२४ सालासाठी बाहेरून कर्ज उभारणी मयदिची नोंद घेणे., **१०.** सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एक रकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत मंजूर झालेल्या प्रस्तावाची नोंद घेणे, **११.** मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय

**दिनांक २७/०८/२०२४**

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**महेश विनायकराव तांबोळकर**
प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी

**✻ टीप :-**
१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास पुन्हा त्याच दिवशी सभा नमूद केलेल्या ठिकाणी अध्यर्ध्या तासानंतर घेण्यात येईल, त्या सभेसाठी गण संख्येची आवश्यकता असणार नाही. २) कोणत्याही सभासदास कांही प्रश्न विचारावयाचे असल्यास सभेच्या दिनांकापूर्वी २ दिवस अगोदर बँकेच्या कार्यालयात लेखी सादर करावेत. (प्रश्नकत्यनि आपण स्वतः थकबाकीदार अथवा थकबाकीदारांचे जामीनदार नाही. तसेच शेअर्सची किमान रक्कम पूर्ण भरलेली आहे याची खात्री करून घ्यावी.) ३) बँकेच्या नवीन उपविधीनुसार ज्या सभासदांची भाग रक्कम अपुर्ण आहे त्यांनी ती पूर्ण करून घ्यावी.

## दृष्टिक्षेप

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी मुस्लिम 'शरणार्थी' बद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. जर ही समस्या लवकरात लवकर संपुष्टात आली नाही तर ती संपूर्ण युरोपसाठी कॅन्सरप्रमाणे ठरेल, असा स्पष्ट इशारा मेलोनी यांनी दिला.

# जिहादींना युरोपात स्थान नाही जॉर्जिया मेलोनी कडाडल्या...




इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आपल्या रोखठोक आणि आक्रमक वक्तव्यांसाठी प्रसिद्ध आहे. युरोपमध्ये, आज इस्लामच्या कट्टरपंथी स्वरूपाविषयी तीव्र चिंता व्यक्त केल्या जात आहेत. धर्मांध मुस्लिम, जिहादींचा अतिशय कडवट अनुभव सध्या इटली घेत आहे. पंतप्रधान मेलोनी यांनी मुस्लिम कट्टरपंथीयांविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली आहे. अलिकडे एका राजकीय कार्यक्रमात बोलताना मेलोनी यांनी इस्लामसाठी युरोपमध्ये स्थान नाही, असे रोखठोकपणे सुनावले. इस्लामच्या मूलभूत धर्मांध प्रवृत्तीवर बोट ठेवून त्यांनी जिहादी व कट्टरवाद्यांना स्पष्ट शब्दात इशारा दिला. 'ब्रदर्स ऑफ इटली पार्टी' ने आयोजित केलेल्या कार्यक्रमात पंतप्रधान मेलोनी बोलत होत्या. या कार्यक्रमात ब्रिटनचे पंतप्रधान ऋषी सुनक यांनी देखील सहभाग घेतला होता. आपल्या भाषणात, इटलीच्या पंतप्रधानांनी कट्टरपंथी, जिहादी इस्लामिक शक्तींच्या युरोपमधील वाढत्या दहशतीकडे लक्ष वेधले. त्या म्हणाल्या की, अशा संस्कृतीसाठी युरोपमध्ये स्थान नाही. मेलोनी पुढे म्हणाल्या, इस्लामची मूलगामी संस्कृती आणि युरोपच्या सांस्कृतिक मूल्यांमध्ये कोणतीही समानता नसणे यामुळे मोठीच समस्या निर्माण झाली आहे. कदाचित मेलोनींचा संकेत इस्लामच्या शरिया विचाराविषयी होता जो जगातील सर्व संस्कृती स्वीकारत नाही, जो केवळ स्वत:ला सर्वोत्कृष्ट मानतो, ज्यात स्त्रियांना काही महत्त्व दिले जात नाही.

इटलीतील विद्यमान इस्लामिक संस्कृती केंद्रांना सौदी अरबकडून पैसा येतो, जेथे शरिया कायदा लागू आहे व समस्येचे मूळ कारण हेच आहे, याकडे मेलोनी यांनी लक्ष वेधले. वैश्विक कल्याणाची शाश्वत मूल्ये पसरविण्याऐवजी इस्लामीकरण करण्यासाठी ही केंद्रे युरोपमध्ये कार्यरत आहेत. इटालियन पंतप्रधान ज्या कार्यक्रमात बोलत होत्या त्या कार्यक्रमाचे आयोजन इटलीच्या ब्रदर्स ऑफ इटलीने रोम येथे केले होते. हा पक्ष राष्ट्रवादी, उजव्या विचारसरणीचा मानला जातो.

या कार्यक्रमात उपस्थित असलेल्या ब्रिटिश मुत्सद्यांनीही 'शरणार्थी' बद्दल चिंता व्यक्त केली. हे शरणार्थी कट्टर इस्लामच्या विचारांनी युरोपमध्ये येत आहेत, याकडे या अधिकाऱ्यांनी लक्ष वेधले. शरणार्थी, स्थलांतरितांच्या प्रक्रियेवर त्वरित अंकुश लावण्याची मागणी त्यांनी केली. जर ही समस्या त्वरित सोडविली नाही तर ती कॅन्सरप्रमाणे वाढू शकते, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. निर्वासित कायद्यात जागतिक स्तरावर बदल घडवून आणण्यासाठी इंग्लंडचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक पुढाकार घेत आहेत. युरोपच्या विविध देशांमध्ये मुस्लिम 'शरणार्थीं'ची अतिशय वेगाने वाढणारी संख्या तेथे एक मोठा धोका आहे. मुस्लिमांची वाढती संख्या युरोपची शांतता आणि समृद्धी संपुष्टात आणत आहे, असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. माजी ब्रिटिश पंतप्रधानांनी स्पष्टपणे सांगितले की काही शत्रू शक्ती आपल्या समाजावर नियोजित पद्धतीने आक्रमण करीत आहेत. जर या समस्येचा तातडीने सामना केला गेला नाही तर मुस्लिमांची युरोपमधील संख्या प्रचंड वाढेल. याचा परिणाम आमच्या नागरिकांवर नकारात्मक होईल. त्यामुळे स्थलांतर कायद्यात सुधारणा होणे खूप महत्त्वाचे आहे, असे सुनक यांनी ठणकावून सांगितले.

फ्रान्समध्ये सध्या या दिशेने एक चांगला प्रयत्न चालू आहे. तेथे सरकार एक विधेयक आणण्याच्या तयारीत आहे जे इस्लामिक शरणार्थींच्या संख्येवर अंकुश ठेवण्यास मदत करेल. सध्या संसदीय आयोग आपल्या तरतुदींवर वाद घालत आहे. जरी या विधेयकाच्या बाजूने आणि विरोधात बरेच सूर उमटले असले तरी, सर्वांच्या शंका दूर करून विधेयकाचे कायद्यात रूपांतर करता येईल, असे फ्रान्स सरकारला वाटते. ●●

## जीवनशैली

महकसिंह



# नैराश्य टाळण्यासाठी खा या ६ गोष्टी

नैराश्य ही एक मानसिक आरोग्य समस्या आहे, जी आजकाल झपाट्याने वाढत आहे. हे टाळण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सुयोग्य आहार व खाण्याच्या सवयी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

नैराश्य ही मानसिक आरोग्य समस्या आहे व ती सध्या झपाट्याने वाढत आहे. आधुनिक जीवनशैली, चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयी, अनियमित दिनचर्या, अतिमहत्त्वाकांक्षा, अवाजवी अपेक्षा, वस्तुस्थितीचा स्वीकार न करणे, सतत स्पर्धा करणे, मित्रमंडळी, नातेवाईकांशी मनमोकळा संवाद नसणे, सतत भूतकाळाचा व भविष्यकाळाचा विचार करणे, वर्तमानात न जगणे यामुळे देखील मानसिक ताण, चिंता वाढून नैराश्य येऊ शकते. नैराश्य टाळण्यासाठी आणि नियंत्रणात ठेवण्यासाठी योगासन, प्राणायाम, सूर्यनमस्कार व व्यायामासोबतच संतुलित व योग्य खाण्याच्या सवयींना देखील खूप महत्त्व आहे. दररोज काही विशेष आहार घेतल्याने तुमचा केवळ मूडच सुधारेल असे नाही तर नैराश्याची लक्षणे देखील कमी होऊ शकतात. येथे आपण अशा सात गोष्टींबद्दल बोलणार आहोत, ज्या नैराश्य टाळण्यात उपयुक्त ठरू शकतात.

### ओमेगा -३ फॅटी ॲसिडने समृद्ध अन्न

ओमेगा-३ फॅटी ॲसिड मेंदूसाठी खूप फायदेशीर असते. हे मेंदूचे कार्य सुधारते आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते. यासाठी तुम्ही अंबाडीच्या बिया, अक्रोड व चिया बियांचे सेवन करू शकता.

### डार्क चॉकलेट

डार्क चॉकलेटमध्ये फ्लेव्होनॉइड्स, कॅफिन आणि थिओब्रोमाईन असतात, जे मूड सुधारण्यास मदत करतात. दररोज थोड्या प्रमाणात डार्क चॉकलेट खाल्ल्याने तणाव आणि नैराश्याची लक्षणे कमी होऊ शकतात.

### ताजी फळे भाज्या

फळे आणि भाज्यांमध्ये अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात, जे मानसिक आरोग्य राखण्यास मदत करतात. विशेषतः हिरव्या पालेभाज्या, बेरी, संत्री आणि गाजर या फळांचे सेवन केल्याने तुमचा मूड स्थिर राहू शकतो.

### प्रोबायोटिक पदार्थ

प्रोबायोटिक्स तुमच्या आतड्याचे आरोग्य सुधारतात आणि तुमच्या मेंदूवर सकारात्मक परिणाम करू शकतात. दही, किमची आणि लोणचे प्रोबायोटिक पदार्थ तुमचे मानसिक आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

### हळद

हळदीमध्ये कर्क्यूमिन नावाचा सक्रिय पदार्थ असतो, जो दाहक-विरोधी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असतो. हे मूड सुधारण्यासाठी आणि कर्करोगाशी लढण्यासाठी उपयुक्त आहे. दुधात मिसळून किंवा भाज्यांमध्ये घालून सेवन करा.

### ग्रीन टी

ग्रीन टीमध्ये एल-थेनाइन नावाचे अमिनो ॲसिड असते, जे मेंदूला शांत मदत करते. हे तणाव आणि चिंता कमी करून मूड स्थिर करते. दररोज १-२ कप ग्रीन टी प्यायल्याने मानसिक शांती मिळते.? ●●

(पांचजन्यवरून साभार)

## विश्व

सोनाली मिश्रा

# ब्रिटनमध्ये वाढतोय् इस्लामिक कट्टरतावाद

इराण ब्रिटनमध्ये इस्लामिक कट्टरता वाढवत आहे का? असा प्रश्न एका ब्रिटिश संस्थेच्या अहवालाच्या आधारे निर्माण झाला आहे. वस्तुस्थिती ही आहे की अलिकडच्या काळात, ब्रिटनमध्ये इस्लामिक कट्टरतावादाच्या अनेक घटना घडल्या आहेत, ज्यामध्ये इस्लामचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या कथित अपमानाच्या विरोधातील आंदोलनाला प्रोत्साहन देणे तसेच 'द लेडी ऑफ द हेवन' या चित्रपटाला विरोध करणे यासारख्या प्रमुख घटनांचा समावेश आहे. इंग्लंडमधील शाळाबाहेर आणि रस्त्यावर निदर्शने आयोजित करण्यात इराण महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्याचा स्पष्ट आरोपही 'यूके पॉलिसी एक्सचेंज' च्या अहवालात करण्यात आला आहे.

इस्लाम व प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या कथित अपमानाच्या घटनांचा निषेध करण्यासाठी इंग्लंडमध्ये ठिकठिकाणी निषेध आंदोलनाचे आवाहन करण्यात आले आहे. या आंदोलनांमागे इराणच असून ब्रिटिश मुस्लिमांवर इराणच्या इस्लामिक राजवटीचा प्रभाव आहे, असे यूके पॉलिसी एक्सचेंजने आपल्या अहवालात म्हटले आहे. या घटनांवरून इराणचे ब्रिटनशी वर्तन शत्रुत्वाने भरलेले असल्याचे, अहवालात म्हटले आहे. तसेच ब्रिटन सरकार एकीकडे सायबर सुरक्षेसाठी वचनबद्ध असताना दुसरीकडे इराण हे या क्षेत्रात ब्रिटनसाठी सर्वात मोठे आव्हान असल्याचे सांगण्यात आले आहे. स्कॉटिश फुटीरतावादाला चालना देण्यासाठी इराण कशाप्रकारे बनावट संकेतस्थळांचा वापर करीत आहे याचाही तपशील



या अहवालात देण्यात आला आहे.

या थिंक टँकच्या अहवालात अशा घटनांचाही उल्लेख करण्यात आला आहे ज्यामध्ये ब्रिटिश मुस्लिम समुदायावर इराणचा वाढता प्रभाव दिसून येतो. या अहवालात ब्रिटनमधील शाळांमधील दोन घटनांचा उल्लेख आहे, ज्यात इस्लाम व प्रेषितांच्या अपमानासंदर्भात निषेध आंदोलन करण्यात आले. या घटनांपैकी पहिली घटना २०२१ मध्ये बेटले ग्रामर स्कूलची आहे. बेटले ग्रामर स्कूलमधील एका शिक्षकाला लपून बसावे लागले. कारण त्याने आपल्या विद्यार्थ्यांना मोहम्मद पैगंबरांचे व्यंग्यचित्र दाखविले होते. या घटनेच्या निषेधार्थ जिहादी मुस्लिमांनी आंदोलन केले होते. दुसरी घटना वेकफिल्डमधील एका शाळेत घडली होती. या शाळेतील चार विद्यार्थ्यांना शाळेतून निलंबित करण्यात आले. कारण त्यांच्यापैकी एकावर कुराणाची प्रत फाडल्याचा आरोप होता. यासोबतच इस्लाम धर्माचे प्रेषित मुहम्मद पैगंबर यांची कन्या फातिमा यांच्यावर आधारित चित्रपटाच्या विरोधात झालेल्या आंदोलनाचाही या अहवालात उल्लेख आहे. या चित्रपटाला मुस्लिम देशांनी देखील विरोध केला होता आणि ब्रिटनमध्येही या चित्रपटाला मोठा विरोध झाला होता. रस्त्यावर अशी उघडउघड निदर्शने करणाऱ्या मुस्लिमांना इराणचे 'वैचारिक पाठबळ' मिळत असल्याचे थिंक टँकच्या अहवालात म्हटले आहे. तसेच इंग्लंडच्या इस्लामिक केंद्राचे (इस्लामिक सेंटर ऑफ इंग्लंड) संचालन इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या प्रतिनिधीद्वारे केले जाते आणि ते युकेमधील इराणच्या 'अस्तित्वाचे' मुख्य केंद्र आहे, असा दावाही या अहवालात करण्यात आला आहे. आयसीएल हे केवळ एक धार्मिक केंद्र नाही तर या केंद्राच्या माध्यमातून इराण ब्रिटनमध्ये आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. पॉलिसी एक्स्चेंजच्या अभ्यासात असेही आढळून आले आहे की, इराणकडून ब्रिटनच्या सुरक्षाविषयक तसेच धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांना देखील धोका आहे. किंबहुना, इराण अशा धर्मांध, जिहादी आणि सरकार पुरस्कृत मौलानांना पश्चिम लंडनमध्ये पाठवत आहे, जे ब्रिटनच्या एकता आणि अखंडतेसाठी अतिशय धोकादायक आहेत.

पॉलिसी एक्स्चेंजने केलेल्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की इराणने ब्रिटनमध्ये राजकीय-धार्मिक संरचना स्थापन करण्यासाठी अनेक दशके मेहनत केली आहे आणि ही धार्मिक संरचना आहे इस्लामिक सेंटर ऑफ इंग्लंड. ही ब्रिटनमधील नोंदणीकृत धर्मादाय संस्था आहे. इराण या केंद्राचा वापर ब्रिटनची मूल्ये नष्ट करण्यासाठी आणि अपवित्र कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आधार म्हणून करतो, असेही पॉलिसी एक्सचेंज तर्फे केलेल्या अध्ययनातून स्पष्ट झाले आहे. ●●

(पांचजन्यवरून साभार)

## धर्म/अध्यात्म

डॉ. उज्ज्वला चक्रदेव



# भारत व बालीमधील अतूट बंध...

जगाच्या पाठीवर, विविध ठिकाणी समान परंपरा साजरा करण्याची वेळ आली आहे. इंडोनेशियाच्या बाली येथील हिंदूंच्या धार्मिक परंपरा भारतातील सनातन धर्माच्या अनुयायांसारख्याच आहेत. बाली येथील वैशिष्ट्य म्हणजे तेथील घरगुती, खाजगी मंदिरे. भारतातील विविध मंदिरांप्रमाणेच तेथील मंदिरातही पूजा, आरती होते. तसेच प्रसाद वितरित केला जातो.ते देखील आपल्याप्रमाणेच अतिथींना तीर्थप्रसाद देतात. समान धार्मिक परंपरेचा, श्रद्धेचा हा धागाच दोन्ही देशातील हिंदूंना एकत्र बांधून ठेवतो.

या जगात गूढ, अद्भुत, अगम्य अशा बऱ्याच गोष्टी आहेत. काही गोष्टी तर अशा असतात की शेवटपर्यंत त्याची उकल होत नाही. परमेश्वर निर्मित अनेक गोष्टींचाही शेवटपर्यंत उलगडा होत नाही. जगातील सर्व संस्कृतींमध्ये श्रद्धा, विश्वास, परंपरा यांचे मोठेच स्थान आहे. संस्कृतीचे मूर्त व अमूर्त असे दोन अंग आहे. श्रद्धा, विश्वास, आस्था, धारणा, परंपरा, रुढी, लोकाचार, नैतिक व आध्यात्मिक मूल्ये हे सारे घटक संस्कृतीचे अमूर्त अंग आहे. तर बाह्य संस्कृती म्हणजे शिल्पकला, वास्तू, मंदिरे, प्रासाद, पोषाख याचा अंतर्भाव होतो. आपल्या पूर्वजांनी एक श्रेष्ठ संस्कृती या भारतात विकसित केली. या संस्कृतीमुळे जगातील लोकही आकर्षित झाले. भारतीय संस्कृती विविध माध्यमातून जगात विस्तारली. इंडोनेशिया, मलेशिया, बाली, जावा, सुमात्रा येथे भारतीय संस्कृतीच्या पाऊलखुणा उमटल्या. बाली तर आज इंडोनेशियातील हिंदू संस्कृतीचे जणू केंद्रच ठरले आहे. तेथील धर्म आणि संस्कृती अध्यात्माने प्रेरित आहे आणि या विशेष वारशाचे सर्वांत मोहक वैशिष्ट्य म्हणजे तेथील घरगुती देवस्थान-मंदिरे. ही पवित्र स्थाने 'पालिंगगिह' म्हणून ओळखली जातात. ही घरगुती मंदिरे बेटावरील प्रत्येक घराच्या परिसरात आढळतात. येथे दररोज भक्ती आणि परमेश्वराची आराधना होते. बालीतील पारंपरिक हिंदूंच्या घरातील अंगणात ही मंदिरे अगदी आवर्जून असतात. विशिष्ट उद्देशाने तेथे सेवा दिली जाते आणि विविध घटकांना, संस्थांना समर्पित असतात. जसे की :

संगगाह पेंगेजेंग- अंगणात मध्यभागी कमी-अधिक प्रमाणात स्थित, एकल कंपार्टमेंटसह छप्पर असलेले हे मंदिर मालमत्तेचे रक्षक किंवा काळजीवाहू म्हणून कार्य करते आणि कुटुंबातील पूर्वजांना हे मंदिर समर्पित आहे.

केमुलन मंदिर-या छप्पर असलेल्या मंदिरात तीन बाजूंनी कंपार्टमेंट्स आहेत आणि असे मानले जाते की ब्रह्मा, विष्णू आणि महेश या हिंदू त्रिदेवांचे हे प्रतिनिधित्व करते.

पालिंगगिह टाकसू : हे टाकसू एखाद्याचा व्यवसाय किंवा प्रतिभेच्या देवतेला समर्पित आहे.

तुगु किंवा पेनुंगगुन करंग : ते 'भटारा काला' यांना समर्पित आहेत. भटारा कला म्हणजे राक्षस आणि संरक्षण या दोन्हींशी संबंधित एक देवता. एपीट लवांग : हे तीर्थस्थान मंदिर, चांगल्या हेतूंचे स्वागत करण्यासाठी आणि वाईट हेतूने येणाऱ्यांना प्रतिबंध करण्यासाठी, त्यांना रोखण्यासाठी समर्पित आहे. घराच्या प्रवेशद्वाराचे पालक म्हणून हे मंदिर कार्य करते.

संगगाह पाओन आणि संगगाह सुकान : स्वयंपाकघरात स्थित, 'भटारा ब्रह्म' यांना समर्पित आहे. आगीशी संबंधित देव अर्थात अग्निदेवतेला आणि विहिरीजवळ असलेल्या संगगाह सुकान म्हणजे पाण्याची देवता 'भटारा विष्णू' यांना समर्पित आहे.

पद्मासन : पद्मासन अर्थात पद्मतीर्थ. पद्मासनाचे अपार आध्यात्मिक महत्त्व आहे. हे कमळाच्या पानांचे प्रतीक आहे. पारंपरिकदृष्ट्या परमेश्वराचे स्थान मानले जाते. मेरू- मेरू तीर्थ, हे त्याच्या आगळ्यावेगळ्या स्तरीय रचनेसाठी प्रसिद्ध आहे. हे वैशिष्ट्यपूर्ण मेरू मंदिर सामान्यपणे सर्वसामान्य कौटुंबिक मंदिरांमध्ये हे आढळत नाही.

बाली येथील हिंदू दररोज सकाळी केळीच्या पानात गुंडाळलेली फुले व धान्य आपल्या कौटुंबिक मंदिरांमध्ये अर्पण करतात. यावेळी कल्याणकारी प्रार्थना होते. काहीवेळा प्रसाद वितरण वाईट आत्म्यासाठी आहेत. द्वैत अर्थात द्वंद्व हे बालीच्या आध्यात्मिक संरचनेचा मुख्य भाग आहे. हे सर्व चांगले आणि वाईट यांच्यात संतुलन राखण्याबद्दल आहे. कारण जगात दोघांचेही अस्तित्व आहे.

लहानपणी दररोज संध्याकाळी मी अंगणात मैत्रिणींसह खेळण्यात मग्न असायचे. दिवेलागण झाली की आई आम्हाला जोरात आवाज देऊन घरी बोलवायची. घरात पाऊल टाकल्यावर आधी हात पाय धुवावे लागत. त्यानंतर घरातील देवघरात, देवाजवळ दिवा लावायचा. मग प्रार्थना, स्तोत्रे वगैरे होत असे. भौगोलिक दृष्ट्या भारतापासून कितीतरी दूर असलेल्या बालीमध्ये देखील या धार्मिक, आध्यात्मिक प्रथा परंपरा जपल्या जात आहे. भारतातील हिंदूंच्या घरात संध्याकाळी देवाजवळ दिवा लावला जातो तसेच इंडोनशियातील हिंदूंच्या वस्तीत आढळते. संस्कृतीचा, समानतेचा हा अतूट धागाच आम्हाला एकत्र बांधून ठेवतो. हिंदू संस्कृती, जीवनमूल्ये, श्रद्धा, परंपरा, विश्वास, चालीरीती, जीवन जगण्याची पद्धत याचा आशिया खंडातील अनेक देशांवर प्रभाव पडला आहे. हिंदूंची जीवनशैली आणि जगण्याचे तत्त्वज्ञान अनेक देशातील लोकांनी अंगीकारले आहे. ●●

(ऑर्गनायझरवरून साभार)

## द्वीपावरील हिंदू मंदिर

'इंडोनेशियातील बाली द्वीपावर ८७ टक्के लोक हिंदू आहेत. बाली येथील मंदिरांना 'पुरा' या नावाने संबोधले जाते. त्यांतील पुरा बेसाखी, पुरा तीर्थ एंपुल, पुरा तनाह लोट आणि पुरा उलुवातू ही प्रमुख आहेत.

बालीची राजधानी देनपासर येथून ३५ कि.मी. अंतरावर असलेल्या तंपकसिरिंग गावाजवळ एक मोठे तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी एक मंदिरही आहे. हे मंदिर श्रीमन्नारायणासाठी बांधले असावे, असे म्हणतात. बाली येथील हिंदू या तीर्थाला 'पवित्र अमृत तीर्थक्षेत्र' मानतात. या तीर्थक्षेत्री स्नान केल्याने चर्मरोग आणि इतर व्याधी दूर होतात', अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे अनेक भाविक या तीर्थक्षेत्री स्नान करण्यासाठी येतात. या तीर्थक्षेत्रापासून ५० मीटर अंतरावर मुख्य मंदिर आणि त्या मंदिराच्या शेजारी मुख्य स्वयंभू तीर्थक्षेत्र आहे.

बालीमध्ये ७ सागर मंदिरे आहेत. त्यापैकी एक



म्हणजे 'तनाह लोट मंदिर'. बालिनी भाषेत 'तनाह लोट' म्हणजे 'समुद्र भूमी' असा अर्थ होतो. समुद्र भूमी म्हणण्याचे एक कारण असे की, हे मंदिर समुद्रात; पण भूमीला लागून आहे. बाली येथील हिंदूंचे म्हणणे आहे की, या मंदिराच्या खाली अनेक विषारी नाग आहेत. हे नाग मंदिराचे सतत रक्षण करतात. हे मंदिर निर्थ नावाच्या एका ऋषींनी वरुणदेवता अथवा समुद्रदेवता यांच्यासाठी बांधलेले मंदिर असावे. हे मंदिर बालीची राजधानी देनपासर या शहरापासून २० कि.मी. अंतरावर आहे. मंदिरात कोणतीही मूर्ती नसून केवळ एक पूजापीठ आहे. याला 'पद्मासन' असे म्हणतात. ●●

## आरोग्य

नाशपती हे एक स्वादिष्ट आणि पौष्टिक फळ आहे, जे केवळ पचनसंबंधी समस्या दूर करण्यासाठीच नव्हे तर इतर अनेक आजारांवर देखील फायदशीर आहे.

# पचनासंबंधित समस्या दूर करणारी नाशपती

### अनेक रोगांवर देखील फायदेशीर

**नाशपती** हे एक स्वादिष्ट आणि पौष्टिक फळ आहे जे केवळ पचनाच्या समस्या दूर करण्यासाठीच नव्हे तर इतर अनेक आजारांवर देखील फायदेशीर आहे. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला नाशपती खाण्याचे आरोग्यदायी फायदे सांगणार आहोत.

**पचनसंस्था निरोगी राहण्यास मदत**

नासपतीमध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असते, जे पचनसंस्था निरोगी ठेवण्यास मदत करते. बद्धकोष्ठता आणि इतर पचनसंबंधी समस्या दूर करण्यासाठी उपयुक्त आहे. फायबर असल्यामुळे अन्न सहजपणे पचते आणि पोटाच्या समस्या कमी होतात.

### हृदयाचे आरोग्य

नाशपतीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर जास्त प्रमाणात असतात जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. हे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते आणि हृदयविकाराचा धोका कमी करते.

### वजन कमी करण्यास उपयुक्त

नाशपतीमध्ये कॅलरीचे प्रमाण कमी आणि फायबरचे जास्त असते, जे भूक नियंत्रित ठेवण्यास मदत करते. हे वजन कमी करण्यासाठी एक उत्कृष्ट फळ आहे कारण ते दीर्घकाळ पोट भरलेले राहण्यास मदत करते.

### मधुमेह नियंत्रण

नाशपतीचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो, ज्यामुळे रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत होते. विशेषतः टाईप २ मधुमेहाच्या रुग्णांसाठी हे फायदेशीर आहे.

### त्वचेचे आरोग्य

नाशपतीमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असतात जे



त्वचेला निरोगी आणि चमकदार ठेवण्यास मदत करतात. यामुळे त्वचेवरील सुरकुत्या आणि त्वचेच्या इतर समस्या कमी होतात तसेच त्वचा तरुण राहते.

### रोगप्रतिकारक शक्ती होते मजबूत

नाशपतीमध्ये व्हिटॅमिन सी मोठ्या प्रमाणात असते, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. हे सर्दी, खोकला आणि इतर संक्रमण टाळण्यास मदत करते.

### दम्याची लक्षणे कमी

नाशपतीमध्ये आढळणारे फ्लेव्होनॉईड्स आणि अँटीऑक्सिडंट्स दम्याची लक्षणे कमी करण्यास मदत करतात. यामुळे श्वसन प्रणाली निरोगी राहते आणि दम्याचा अटॅक येण्याची शक्यता कमी होते. ●●

(पांचजन्यवरून साभार)

# हिंगोलीत मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत

## शहरात अनेक भागात घरात पाणी शिरले, पालिका प्रशासनाकडून २०० पेक्षा जास्त कुटुंबांचे स्थलांतर



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ सप्टेंबर**

हिंगोली शहरासह जिल्ह्यात मागील १६ तासांपासून मुसळधार पावसाला सुरूवात झाली. पावसाचा जोर वाढतच असल्यामुळे शहरातील सखल भागातील घरांमध्ये पाणी शिरल्याने पालिका प्रशासनाकडून सुमारे २०० कुटुंबांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यात आले आहे. घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे घरातील संसारोपयोगी साहीत्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दुसरीकडे मुसळधार पाऊस पडल्याने शेतात पाणी साचल्याने पिकांचेही नुकसान होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. यावर्षी पहिल्यांदाच शहरातून वाहणाऱ्या कयाधू नदीला पूर आला आहे.

शनिवारी रात्री पासून हिंगोली शहरासह जिल्ह्यात मुसळधार पावसाला सुरूवात झाली. सोमवारी सकाळी सहा वाजल्यापासून संततधार मुसळ–धार पाऊस पडत होता. त्यामुळे शहरातील सिध्दार्थनगर, मस्तानशहा नगर, बांगर नगर, जीनमाता नगर, महादेववाडी, निरंजनबाबा चौक या भागातील मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर पाणी साचले. तसेच शहरातील रस्त्यांना नदीचे स्वरूप आले होते. रस्त्यावरील पाणी घरांमध्ये शिरल्याने संसारोपयोगी साहीत्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पालिका प्रशासन, पोलिस प्रशासन तसेच जिल्हा प्रशासनाने संयुक्त मोहीम हाती घेत सुमारे २०० कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे.


तसेच अनेक ठिकाणी पथके रवाना करण्यात आले आहे. नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, अभियंता रत्नाकर अडसिरे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह बचाव पथकाने शहरातील विविध भागात पाहणी सुरू केली असून आवश्यक ठिकाणी नागरिकांचे स्थलांतर करण्यात येत आहे.

दरम्यान जिल्हाधिकारी अभिनव गोयल, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्यासह पोलिस कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत. सखल भागात साचलेले पाणी काढून देण्यासाठी नगर पालिकेकडून प्रयत्न केला जात आहे.

शहरातील सिरेहक शाह बाबा तलाव पहिल्यांदाच भरल्यामुळे तलावाचे पाणी नवीन रेल्वे पूलाखालील नाल्यातून बांगर नगर, जीनमाता नगरमध्ये शिरले. तसेच पुलाखाली जिल्हा परिषद ते एसआरपी कँम्पकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्यामुळे बांगर नगरमधील एबीएम इंग्लीश स्कुलच्या शाळेच्या बसेसही पाण्यात जवळपास बुडाल्याचे पहावयास मिळाले. तातडीने जिल्हा परिषद ते खटकाळीकडे जाणारा पूलाखालून जाणारा रस्ता प्रशासनाने वाहतुकीसाठी बंद केला.













**भर पावसात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली पाहणी**

सोमवारी हिंगोली शहरासह जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे शहरातील विविध भागात पाणी लोकांच्या घरात शिरले. भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मुसळधार पावसात या भागाचा दौरा करीत तेथील नागरिकांना दिलासा देत जिल्हा प्रशास–नाला तत्काळ संबंधित नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शहरातील सखल भागातील पाणी साचलेल्या पाहणी केली तसेच पालिका प्रशासनाला तत्काळ उपाययोजना करण्याच्या सूचनाही दिल्या..

**नागरिकांच्या स्थलांतराचे नियोजन केले आहे– जिल्हाधिकारी**

हिंगोली शहरातील सखल भागात पाणी शिरल्याने अनेकांच्या घरात पाणी घुसले आहे. या नागरिकांना स्थलांतरीत करण्यासाठी योग्य त्या सुचना दिल्या असून त्यांना शहरातील मंगल कार्यालय, शाळांमध्ये सुरक्षित ठेवले जाणार आहे. आम्ही परिस्थितीवर संपूर्ण लक्ष ठेवून आहोत, अशी माहीती जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली.

**मदतीसाठी नागरिकांनी संपर्क साधावा– पोलिस अधीक्षक**

शहरातील परिस्थिती लक्षात घेता शहर पोलिस ठाणे, ग्रामीण पोलिस ठाणे तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तैनात करण्यात आले आहे. नागरिकांना काहीही अडचण निर्माण झाल्यास तसेच तातडीची मदत लागल्यास पोलिस प्रशासनाशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

**नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये– मुख्याधिकारी**

शहरातील सखल भागात साचलेले पाणी काढण्यासाठी पालिकेचे तसेच नैसर्गिक आपत्ती कक्षाचे पथक कार्यरत आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच सर्व परिस्थितीचा सामना करण्यासाठी पालिका प्रशासन सज्ज आहे, अशी प्रतिक्रीया मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांनी दिली.

शहरातील गांधी चौक, इंदिरा गांधी चौक आदी भागात रस्त्याचे पाणी दुकानात शिरल्याने दुकानातील सामानाचे नुकसान झाले. मंगळवारी पोळा असल्यामुळे शहरातील बाजारपेठेत विविध साहीत्यासह बैल विक्रीसाठी आणले होते. मुसळधार पावसामुळे बाजारात पाणी साचल्याने हिरमोड झाला आहे. मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

शहरासह ग्रामीण भागातही पावसाचा जोर असल्यामुळे शेतात मोठ्या प्रमाणात पाणी साचले असून सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. सावरखेडा भागातील शेतातमध्ये सोयाबीन व इतर पिकांच्या शेतात पाणी साचल्याने तलावाचे स्वरूप आले आहे. कनेरगाव ते हिंगोली रेल्वे मार्गावर कनेरगाव जवळ रेल्वे पटरीखालील गिट्टी वाहून गेली असून इलेक्ट्रीक ओव्हरहेडचे पोलही तुटून पडल्याचे दिसत आहेत. त्यामुळे हैद्राबादहून मुंबईकडे जाणारी देवगिरी सहीत अनेक रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत.

## संक्षिप्त वृत्त

### कोनाथा येथे नदीला पहिल्यांदाच पूर



वसमत– तालुक्यात मध्यरात्रीपासून मुसळधार पाऊस सुरू झाला आहे. या पावसामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे यामध्ये कापूस, सोयाबीन, ऊस, हळद या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाने त्वरित पंचनामा करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. वसमत तालुक्यातील सकाळपासूनच नद्यांना महापूर आलेला दिसून आला. यामध्ये कोनाथा तेल–गाव रिधोरा, कौडगाव, आरळ या गावांमध्ये नद्यांनी दुथडी भरून वाहत होत्या. हिंगोली, परभणी, नांदेड या जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी व मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे हवामान विभागाने जाहीर केले होते. कोनाथा गावात पुराचे पाणी पहिल्यांदाच गावात शिरले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. लोक सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करीत आहेत.

### औंढ्यात मुसळधार पाऊस, घरात पाणी शिरले



औंढा नागनाथ– शहरात शनिवारी रात्रीपासून मुसळधार पावसाला सुरूवात झाली. सोमवारी अतिवृष्टी झाल्याने शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. शहरातील मंदिर परिसर, सम्राट चौक, बसस्थानक परिसर तसेच हिंगोली औंढा रस्त्यावर गुडघाऐवढे पाणी साचले. सखल भागातील पाणी अनेकांच्या घरात शिरल्याने घरातील संसारोपयोगी वस्तुंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नगर पंचायतकडून पावसाळ्यात नालेसफाई न झाल्याने नाल्याचे पाणी रस्त्यावर आल्याने शहरातील अनेक भागात पाणी साचले होते. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. औंढा तालुक्यातील काही गावात अतिवृष्टी झाल्यामुळे शेताला तळ्याचे स्वरूप आले होते. यावर्षी पिके चांगली वाढली परंतु आज झालेल्या अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, हळद आदी पिकांचे नुकसान होणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

## मुख्यमंत्री–माझी लाडकी बहिण योजनेत २ लाख ७८ हजार ५६८ महिलांचे अर्ज पात्र

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ सप्टेंबर**

राज्य शासनाच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'या महत्त्वाकांक्षी योजनेसाठी हिंगोली जिल्ह्यात आतापर्यंत एकूण २ लाख ८६ हजार ४१५ लाभार्थी महिलांनी अर्ज भरले होते. या प्राप्त अर्जाच्या छाननीमध्ये २ लाख ७८ हजार ५६८ लाभार्थी महिलांचे अर्ज पात्र ठरले आहेत. छाननीच्या कामाला गती आली असून हिंगोली जिल्ह्याचे ९७ टक्के काम पूर्ण झाले आहे, अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जिल्ह्यात दि. २७ ऑगस्ट, २०२४ पर्यंत पवर १ लाख ७९ हजार २१२ अर्ज व पोर्टलवर १ लाख ७ हजार २०३ अर्ज प्राप्त झाले आहेत. पवर प्राप्त झालेल्या १ लाख ७९ हजार २१२ प्राप्त अर्जापैकी १ लाख ७७ हजार ५७२ अर्ज पात्र ठरले आहेत. तर १०८९ अर्ज तात्पुरत्या स्वरुपात रद्द करण्यात आलेल्या आहेत. ९९ टक्के अर्ज ठरले आ–हेत. तर पोर्टलवर प्राप्त झालेल्या १ लाख ७ हजार २०३ अर्जापैकी १ लाख ९९६ अर्ज पात्र ठरले आहेत, तर ३ हजार ८८६ अर्ज तात्पुरते रद्द करण्यात आले आहेत. पोर्टलवरील पात्र अर्जांची टक्केवारी ९४ अशी आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे राज्य शासनाने लाभार्थी निवडीचे दिलेले उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करण्याचे जिल्हा प्रशासनाचे लक्ष्य आहे. त्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी, शासकीय, निमशासकीय कार्यालये, संस्था व नागरिक परिश्रम घेत आहेत. त्यामुळे चांगले काम करण्यास प्रशासनास मदत होत आहे.

ग्रामीण भागातील जास्तीत जास्त पात्र महिला लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने जिल्ह्या–तील सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका यांच्याशी संपर्क साधून अर्ज भरावेत.

मुख्यमंत्री – माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत महिला लाभार्थ्यांचे अर्ज भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यासाठी संकेतस्थळ दि.१ ऑगस्ट पासून सुरु करण्यात आले आहे, नारी शक्ती दूत पवर अर्ज भरलेल्या अर्जदारांना पुन्हा पोर्टलवर अर्ज भरण्याची गरज नाही. ज्या पात्र इच्छुक महिला लाभार्थांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत त्यांनी संकेतस्थळावर जाऊन आपले अर्ज भरावेत, असे आवाह–नही जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## आ. मुटकुळेंची गजराज गणेश मंडळासोबत बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ सप्टेंबर**

शहरातील पोस्ट ऑफीस रोडवरील गजराज गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी बैठकीत चर्चा केली. यावेळी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी पदाधिकाऱ्यांच्या अडीअडचणी ऐकून घेत गणेशोत्सव शांततेत तसेच विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्याचे आवाहन आ. मुटकुळे यांनी केले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, शहराध्यक्ष कैलाशचंद काबरा, प्रशांत सोनी, हमीद प्यारेवाले आदींची उपस्थिती होती.

## मयत तलाठ्याच्या कुटुंबियास ५० लाख रूपये मदत देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ सप्टेंबर**



महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्या वतीने काळेफिती लावून काम काज करण्यात आले. यावेळी आडगाव रंजेबुवा येथील मयत तलाठी यांच्या कुटुंबियांना ५० लाख रूपये सानुग्रह अनुदान द्यावे अशी मागणीही करण्यात आली आहे.

आडगाव रंजे येथे कार्यरत तलाठी संतोष पवार यांच्यावर गैरसमजातून हल्ला करून माथेफिरू तरुणाने त्यांची हत्या केली. या घटनेचे पडसाद संपूर्ण जिल्ह्यामध्ये उमटले असून सर्व कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र रोष आहे. या घटनेचा निषेध नोंदवण्यासाठी महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटनेच्यावतीने जिल्हाभरात काळ्याफिती लावून कामकाज करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयासह इतरही कार्यालयाने भरघोस प्रतिसाद देऊन ५०० पेक्षाही जास्त शाळा महाविद्यालयांमध्ये काळ्याफिती लावून कामकाज करण्यात आले. पवार यांच्या कुटुंबीयांना ५० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे. फास्टट्रॅक कोर्टामध्ये खटला चालून आरोपीला तात्काळ शिक्षा करण्यात यावी. कर्मचाऱ्यांसाठी संरक्षण कायदा अमलात आणावा यासह इतर मागण्या शासनाकडे मागितले असून महाराष्ट्र राज्य तलाठी संघाने पुकारलेल्या आंदोलनाला जुनी पेन्शन संघटनेने पाठिंबा दिला आहे.

## जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे ४६ कोटी रूपये वीजबिल माफ होणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १ सप्टेंबर**

मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना लागू करण्यात आली असून, जिल्ह्यातील कृषि पंप ग्राहकांचे अंदाजे ४६ कोटी रुपयांचे वीज बील माफ करण्यात येणार आहे.

हिंगोली मंडळांतर्गत हिंगोली, वसमत, कळमनुरी, औंढा नागनाथ आणि सेनगाव अशा एकूण पाच तालुक्याचा समावेश आहे. हिंगोली जिल्ह्यात महावितरणमध्ये ३० जून, २०२४ अखेर ७.५ एचपी पर्यंत ७६ हजार ५६६ एवढे कृषीपंप ग्राहक आहेत. यामध्ये औंढा नागनाथ तालुक्यातील १२ हजार ३५९, वसमत तालुक्यातील २१ हजार २९२, हिंगोली १२ हजार ७२०, कळमनुरी १४ हजार २०१ आणि सेनगाव तालुक्यातील १५ हजार ९९४ कृषि पंपाचा समावेश आहे.

वरील सर्व ७.५ एचपीपर्यंत कृषीपंप ग्राहकांना महावितरण कंपनीकडून दर तीन महिन्याला वीज बिल देण्यात येतात. वर्ष २०२३–२०२४ मध्ये ७.५ एचपी पर्यंत कृषी पंप ग्राहकांना देण्यात आलेल्या वीज देयकाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील १२ हजार ३५९ कृषि पंप ग्राहकांचे २४.७४ कोटी रुपये, वसमत तालुक्यातील २१ हजार २९२ कृषि पंप ग्राहकांचे ४८.१६ कोटी रुपये, हिंगोली तालुक्यातील १२ हजार ७२० कृषि पंप ग्राहकाचे २७.७६ कोटी रुपये, कळमनुरी तालुक्यातील १४ हजार २०१ कृषि पंप ग्राहकांचे ३६.५८ कोटी रुपये आणि सेनगाव तालुक्यातील १५ हजार ९९४ कृषि पंप ग्राहकांचे ३४.०८ कोटी असे एकूण जिल्ह्यातील ७६ हजार ५६६ कृषि पंप ग्राहकांचे १७१.३२ कोटी रुपये आहे.राज्य शासनाच्या दि. २५ जुलै, २०२४ च्या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना–२०२४ राबविण्यात येत आहे. त्यानुसार ७.५ अश्वशक्तीपर्यंत शेतकऱ्यांच्या कृषि पंपांना मोफत वीज पुरवठा करण्याचे धोरण ठरविले आहे. ही योजना एप्रिल, २०२४ ते मार्च, २०२९ या ५ वर्षासाठी राबविण्यास मान्यता दिली आहे. या योजनेंतर्गत माहे एप्रिल ते जून, २०२४ पर्यंत हिंगोली जिल्ह्यातील ७.५ एचपीपर्यंतच्या शेतीपंप ग्राहकांचे अंदाजे ४६ कोटी माफ करण्यात येणार असल्याची माहिती अधीक्षक अभियंता यांनी कळविले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# मंठा तालुक्याला मिळणार अनुदानापोटी २६ कोटी ५७ लाख रुपये - आ.लोणीकर

## २०२३ चा खरीप हंगामातील परतूर मंठ्याचे रखडलेले ४२ कोटी रु.अनुदान मिळणार

## परतुर तालुक्यासाठी २१ कोटी १४ लाख अनुदान मिळणार – आमदार बबनराव लोणीकर

## जालना जिल्ह्यातील एकुण ६२०४२१ पात्र शेतकऱ्यांना सदर अनुदान योजनेचा मिळणार लाभ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/सुरेश कवडे पाटील**

सन २०२३ च्या खरीप हंगामातील पीक पाहणी दरम्यान पावसाचा १९ दिवसांचा खंड पडल्यामुळे पिक विमा कंपनीने कापूस व सोयाबीन या पिकांचा पीक विमा नाकारला होत त्यासाठी २२ दिवसाचा खंड पडणे आवश्यक असल्याचा निकष कंपनीने सांगितला होता यासाठी माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन जालना जिल्ह्यातील पिक विमा संदर्भात चर्चा केली होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार आमदार लोणीकर व जिल्हाधिकारी यांनी कृषी विभागाची बैठक घेऊन शासन व पिक विमा कंपनीला करपलेली पिके व त्याचा उत्पन्नावर झालेला परिणाम या संदर्भातील आकडेवारी व विमा देणे किती आवश्यक आहे या संदर्भातील सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करणे संदर्भात अहवाल पाठवला होता त्यानुसार केवळ २५ टक्के अग्रीम रक्कम मिळाली होती तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या सरकारने पीक विमा कंपन्यांशी केलेल्या करारानुसार जेवढी उत्पन्नामध्ये घट कंपनीला हवी होती तेवढी झाली नाही या कारणापोटी पीक विमा नाकारण्यात आला होता त्यात बदल करण्यासंदर्भात माजीमंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी या बाबीचा सातत्याने पाठपुरावा करून संपूर्ण जिल्ह्यासाठीचा हा पिक विमा मंजूर करून घेतला आहे यापूर्वी जालना जिल्ह्यातील केवळ ८ मंडळांचा यामध्ये समावेश करण्यात आला होता उर्वरित महसूल मंडळे मात्र वगळण्यात आली होती अशी माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली

राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पीक पाहणीवरील नोंदीत कापूस व सोयाबीन व उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य मंजूर करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. परतुर तालुक्यासाठी कापूस पीकासाठी ९ कोटी १४ लाख व सोयाबीन पीकासाठी १२ कोटी १० लाख असे एकुण २१ कोटी १४ लाख अनुदान मिळणार आहे.तर मंठा तालुक्यासाठी कापूस पीकासाठी ७ कोटी ८७ लाख व 'सोयाबीन पीकासाठी १८ कोटी ७० लाख असे एकुण २६ कोटी ५७ लाख अनुदान मिळणार आहे. परतुर तालुक्यातील लाभ मिळणारे कापूस क्षेत्र व शेतकरी संख्या विचारात घेता वैयक्तिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र १७०२७ हेक्टर इतके असून शेतकरी संख्या २२९०३ इतकी आहे त्याचप्रमाणे सामायिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र ३३०१ हेक्टर असून शेतकरी संख्या ३७९९ इतकी आहे. परतूर तालुक्यातील कापसाचे एकुण क्षेत्र २०३२८ हेक्टर असून एकूण शेतकरी संख्या २६७०२ इतकी आहे. तर मंठा तालुक्यातील वैयक्तिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र १३३४३ हेक्टर असून शेतकरी संख्या ५६३९ इतकी आहे. सामायिक खातेदार कापूस ई पीक पाहणी क्षेत्र ४१६२ हेक्टर असून कापसाचे एकूण क्षेत्र १७५०५ हेक्टर आहे त्यामध्ये २७७७८ शेतकऱ्यांचा समावेश आहे परतुर तालुक्यातील लाभ मिळणारे सोयाबीन पिकाचे वैयक्तिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र २२९६७ हेक्टर असून शेतकरी संख्या २६६३८ इतकी आहे. सामायिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र ३९३९ असून त्याची शेतकरी संख्या ३९७३ इतकी आहे. परतूर तालुक्यात सोयाबीनचे एकूण क्षेत्र २६९०६ हेक्टर असून ३०६११ इतकी शेतकरी संख्या आहे. तर मंठा तालुक्यातील लाभ मिळणारे वैयक्तिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र ३१५०३ हेक्टर असून ३८८२५ इतकी शेतकरी संख्या आहे. सामायिक खातेदार सोयाबीन ई पीक पाहणी क्षेत्र १००६२ हेक्टर असून शेतकरी संख्या १०४४२ इतकी आहे. मंठा तालुक्यातील सोयाबीन एकुण क्षेत्र ४१५६५ हेक्टर असून ४९२६७ शेतकरी संख्या आहे. एका शेतकऱ्यासाठी अनुदान मर्यादा सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट रु.१००० तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रु.५००० (२ हेक्टर मर्यादेत रु.१००००) अर्थ सहाय्य मंजुर करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

या अनुदानाचे वितरण शेतकऱ्यांना सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणांच्या (उद्दढ) माध्यमातून होणार आहे. त्यानुषंगाने अनुज्ञेय अनुदाने शेतकऱ्यांना देण्यासाठी शेतकऱ्यांच्या आधार संबंधी माहितीचा वापर करण्याबाबत त्यांच्याकडुन घेण्यात येणाऱ्या संमती पत्र तसेच सामायिक खातेदारांच्या बाबतीत एकाच खातेदारास अर्थसहाय्य वितरीत करण्याच्या अनुषंगाने घ्यावयाच्या ना हरकत पत्र कृषि सहाय्यकाकडे आधार कार्ड जोडून दि. १९ ऑगस्ट पुर्वी देणेबाबत सूचना करण्यात आली होती. कृषि विभागामार्फत क्षेत्रीय स्तरावर पात्र असलेल्या शेतकऱ्यांकडून संमती पत्र, ना हरकत पत्र स्वीकारण्याचे काम प्रगतीपथावर सुरु आहे. संमती पत्र व ना हरकत पत्र नमूना आपल्या गावाच्या कृषि सहाय्यकाकडे उपलब्ध आहे. सदर योजना फक्त सन २०२३ च्या खरीप हंगामातील ज्या शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी केलेली आहे फक्त अशाच कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान मिळेल. कापुस उत्पादक २७५३९१ शेतक-यांना सदर योजने अंतर्गत लाभ दिला जाणार आहे. सोयाबीन उत्पादक ३४५०३० शेतक-यांना सदर योजने अंतर्गत लाभ दिला जाणार आहे. जालना जिल्ह्यातील एकुण ६२०४२१ पात्र शेतक-यांना सदर योजनेचा लाभ दिला जाणार आहे



## संक्षिप्त

### शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हा संघटकपदी डॉ.सुयोग कुलकर्णी



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

शिवसेना शेतकरी सेनेच्या जिल्हा संघटकपदी प्रगतशील शेतकरी आणि बांबू लागवड चळवळीचे जिल्हा समन्वयक डॉ. सुयोग सुरेशराव कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे उपनेते आणि माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांनी ही नियुक्ती केली आहे.

माजीमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते डॉ.सुयोग कुलकर्णी यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, महानगरप्रमुख विष्णू पाचफुले, भरत मंत्री, योगेश शिंदे, शैलेश बजाज, राजू कोल्हे, दिगंबर पालवे, सरपंच राजेश प्रधान, माजी सरपंच राठोड, खरपूडी येथील दीपक हवाले, सुमित खंदारे आदींची उपस्थिती होती. यावेळी श्री. खोतकर म्हणाले की, डॉ. सुयोग कुलकर्णी हे सन २०१२ पासून वैद्यकीय व्यवसाय सोडून शेती क्षेत्रात कार्यरत झाले आणि त्यांनी आधुनिक शेतीवर भर दिला. डाळिंब उत्पादक संघाचे विभागीय अध्यक्ष आणि राज्य सचिव म्हणून त्यांनी उत्कृष्ट जबाबदारी पार पाडलेली असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या अनेक कार्यशाळा घेतलेल्या आहेत. याशिवाय गेल्या दोन वर्षापासून बांबू लागवड चळवळीच्या माध्यमातून त्यांनी बांबू लागवडीसाठी शेतकऱ्यांना प्रेरित केले आहे. डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी कृषी क्षेत्रात केलेल्या बहुमूल्य कार्याची दखल घेऊन शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हा संघटक म्हणून डॉ. कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना, शेतकरी सेना व युवासेना संघटन वाढीसाठी तसेच मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे विचार तळागाळापर्यंत पोहचवून पक्ष हिताचे काम आपल्याकडून पुढील काळात होईल, असे या नियुक्तीपत्रात श्री. खोतकर यांनी नमूद केले आहे. या नियुक्तीबद्दल सुयोग कुलकर्णी यांचे..ड. हरिभाऊ झोल, ड. किशोर राऊत, ड. पिसुरे, ड. प्रदीप जाधव, ड. सुविध कुलकर्णी, ड. शरद कुलकर्णी, ड. प्रज्ञेश कुलकर्णी, ड. विलास राठोड, ड. अमोल कुलकर्णी, राजेश महाराज सामणगावकर, डॉ. प्रदीप हुशे, डॉ. आनंद बोरिवले, डॉ. मांटे, डॉ. दराडे यांचा शेतकरी आणि व्यापाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. यावेळी डॉ. सुयोग कुलकर्णी म्हणाले की, शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध व्हावे, यासाठी गेल्या दोन वर्षापासून जालना जिल्ह्यात पर्यावरणपूरक बांबू लागवड चळवळीला आपण प्राधान्य दिलेले असून, आजघडीला सुमारे ५०० हेक्टरवर बांबू लागवड झाली. पारंपारिक पिकाला बांबू लागवड हा शाश्वत उत्पन्न देणारा महत्त्वाचा पर्याय असल्याची आता शेतकऱ्यांना जाणीव होऊ लागली आहे. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनीदेखील बांबूचा मनरेगा योजनेत समावेश केला असून, बांबू लागवडीसाठी हेक्टरी सात लाख रुपये एवढे अनुदान दिले जात आहे. शिवसेना शेतकरी सेनेचा जिल्हा संघटक या नात्याने मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि माजीमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना किसान सेनेच्या माध्यमातून बांबू लागवड चळवळ अधिक व्यापक प्रमाणात राबण्यासह पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही डॉ. सुयोग कुलकर्णी यांनी दिली.



युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांच्या मालवण येथील दुर्घटनेच्या निषेधार्थ व या दुर्घटनेत जे कोणी दोषी असतील त्यांच्या वर कठोर कारवाई करण्यात यावी याबाबचे निवेदन अतिरिक्त जिल्हाधिकारी यांना देताना जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण, जेष्ठ नेत्या शकुंतला कदम, आण्णासाहेब चित्तेकर, प्रभाकर घेवंदे, रिंकल तायड, सविता मुळे, शेखर पाटील आदी दिसत आहे.

# संविधान सन्मान रॅलीने शहर दणाणले!

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी लवकर व्हावी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



अनुसूचित जाती प्रवर्गातील आर-क्षणाची वर्गवारी करण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत करत या समर्थनार्थ सकल मातंग समाजाच्या वतीने शनिवारी ( ता. ३१) जालना शहरात संविधान सन्मान रॅली काढण्यात आली. डि. जे. आणि ढोल -ताशांच्या गजरात मामा चौक येथून रॅलीस प्रारंभ झाला. महिलांनी रॅलीचे नेतृत्व केले. आरक्षण आमच्या हक्काचं...,नाही कुणाच्या बापाचं...,,,मातंग समाजाला स्वतंत्र पाच टक्के आरक्षण द्या.., अनुसूचित जाती आरक्षणाची वर्गवारी झालीच पाहिजे..., सरकार आम्हाला पण साहेब व्हायचंय....,,! अशा मागण्यांचे फलक हातात घेतलेल्या महिला, तरुण व समाज बांधवांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा विजय असो. ..,क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचा विजय असो.., सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी झालीच पाहिजे....! अशा गगनभेदी घो-षणा दिल्या. महावीर चौक- सुभाष चौक- मस्तगड- गांधीचमन -शनी मंदिर मार्गे जात जुना जालना भागातील उड्डाणपुलाखाली असलेल्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारकाजवळ रॅलीचा समारोप झाला. राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करावी अशी जोरदार मागणी याप्रसंगी करण्यात आली. प्रशासनास विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी संजूबाबा गायकवाड, लहुजी शक्ती सेनेचे युवा प्रद-ेशाध्यक्ष सचिन क्षिरसागर, जिल्हाध्यक्ष विनोद आठवे, साहित्यरत्न फेस्टिवलचे संकल्पक अंकुश राजगिरे, प्रो. डॉ.दिलीप अर्जुने, संजय इंचे, राहुल कारके, रवि पाखरे,किरण शिरसाट, गंगाधर लोंढे,विलास साबळे,राजु गोफणे, राजीव निकाळजे, ललित कुचेकर, शिवराज जाधव, राम सुतार ,संतोष निकाळजे, विक्की हिवाळे, विकास यंगड, अर्जुन धाकतोडे ,अंबादास थोरात, गणेश लालझरे,शाम सराटे,मनोज गुढेकर, करूणाताई नामवाड, मीराताई सगट, यांच्यासह महिला तरुण व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग नोंदवला.

# भास्करराव देशमुख यांचा सेवापुर्ती कार्यगौरव सोहळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन पंचायत समिती येथे स्थापत्य अभियंता या पदावर कार्यरत असलेले भास्कर दत्तात्रय देशमुख यांनी ३६ वर्ष सेवाभावी वृत्तीने कार्य, पंचायत समिती येथे कर्मनिष्ठेने व कर्तव्यदक्षतेने श्रेष्ठत्तम सेवा देत राहिलात आपले व्यक्तित्व म्हणजे काम हाच परमेश्वर. गरिबीतून संघर्षमय जीवन जगत प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत विकास साधला. नियोजनबद्ध काम, सचोटी, मनमिळावू, कर्तृत्ववान अशी त्यांची गुणवैशिष्टे, एक आदर्श कुटुंब, सामाजिक व धार्मिक कार्य, इतरांना मार्गदर्शन करणे असे गौरमय उदगार पंचायत समिती भोकरदन येथील कर्मचाऱ्याच्या वतीने काढण्यात आले. यावेळी जी.एस.सुरडकर गटविकास अधिकारी भोकरदन,भोसले मुख्याध्यापक बेलोरा, पीडब्ल्यू सोनवणे पंचायत समिती विस्तार अधिकारी भोकरदन, जगताप साहेब प्रशासन अधिकारी, संजय घुले, कैलास सोनवणे, ग्रामसेवक अध्यक्ष तायडे साहेब,ग्रामसेवक संदीप सपकाळ,बकाल भोकरदन पंचायत समिती सर्व कर्मचारी वर्गाची यावेळी उपस्थिती होती. फोटोमध्ये सत्कार करताना गटविकास अधिकारी यांच्या हस्ते भास्करराव लहाने सौ स्वर्णा लहाने यांच्यासह आदी.

# डीजे मुक्त गणेशोत्सव साजरा करा; भोकरदन येथे शांतता कमिटी बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**भोकरदन/प्रतिनिधी**



आगामी येणाऱ्या काळात पोळा व गणोत्सव ईद सणाच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून येथील श्रीकृष्ण मंगल कार्यालयामध्ये शनिवार रोजी पो-लीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता कमिटीची बैठक पार पडली . यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी गणपत दराडे, तहसीलदार संतोष बनकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गजानन सुरडकर, वैद्यकीय अधिकारी सुनंदा काथार यांची उपस्थिती होती, यावेळी पोलीस निरीक्षक किरण बिडवे म्हणाले, पोळा व गणेश उत्सव ईद या सण समारंभाच्या माध्यमातून सलोखा निर्माण होतो. कोणताही अनुचित प्रकार न घडता व गणेश उत्सव सण हा डीजे मुक्त आणि शांततेत साजरा करा, ज्या रस्त्याने गणेश मिरवणूक जाते त्या रस्त्याचे नगरपालिकेने डागडुगी करण्याचे निर्देश नगरपालिकेला देण्यात आले आहे, व त्या ठिकाणावरून लोमकळलेल्या विद्युत तारा वर घेण्याच्या देखील सूचना महावितरणला देण्यात आले असून यावेळी विविध विषयांवर शहरातील सामाजिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची चर्चा झाली. याप्रसंगी मा. नगराध्यक्ष हर्षकुमार जाधव, मुकेश चिने, शब्बीर कुरेशी, महदूसिंग डोभाळ, इरफान सिद्दीकी, शेषराव तळेकर, शफीक पठाण, नाना वानखेडे, त्र्यंबक पाबळे, सुनीता सावंत, शेख कदिर बापू , दीपक बोर्डे, विष्णू गाढे, कडुबा बोरसे, दीपक बोर्डे, संतोष अन्नदाते, रमेश बोरसोने, महेश पुरोहित, एजाज पठाण, विकास जाधव, काकाराव साबळे, सुरेश तळेकर, दीपक मोरे, जोगदंड , महेश औटी, आप्पासाहेब जाधव, सुमित थारेवाल यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उप-स्थित होते.

# शिवछत्रपतीचा अपमान कोन्हीच शिवप्रेमी सहन करणार नाही –राजाभाऊ देशमुख



**तभा वृत्तसेवा,**
**भोकरदन/प्रतिनिधी**

राजकोट, मालवण (कोकन) येथील नौदल व महाराष्ट्र शासन यांनी आठ महिन्यापूर्वीच निकृष्ट प्रतिचे बांधकाम करून या मध्ये प्रचंड भ्रष्टाचार करून सर्वांचे आराध्य दैवत राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण लोकसभेची निवडणूक डोळ्यांसमोर सरकारने घाई गडबडीत देशाचे पंतप्रधान यांच्या हस्ते करण्यात आले होते.परंतु दुर्दैवाने हा महाराजांचा पुतळा कोसळल्यामुळे छत्रपती महाराजांचा जो अपमान झाला तो अपमान कोणताच शिवप्रेमी कदापि सहन करणार नाहीत असे काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख महाविकास आघाडी द्वारे आयोजित जोडे मारा आंदोलना दरम्यान म्हणाले.

भोकरदन येथे महाराजांच्या पुतळ्याच्या निकृष्ट बांधकामाच्या निषेधार्थ दि १ सप्टेंबर रविवार रोजी सकाळी ११ वा येथील शिवाजी महाराज चौकामध्ये केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने जोडे मारो आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना (उबाठा)चे जिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव, ता.प्रमुख नवनाथ दौड, महेश पुरोहित, सुखदेव रावळकर,राष्ट्रवादी (शरद पवार) चे मा नगरसेवक कदीर बापु कादरी,रामदास रोडे,युवकचे जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख,ता.अध्यक्ष त्रिबंकराव पाबळे, मा.नगराध्यक्ष चंद्रकांत पगारे,उपनगराध्यक्ष इरफान सिद्दीकी,संतोष अन्नदाते,रमेश जाधव,सोपान सपकाळ, सरपंच कृष्णा काळे,पवार, राजु सिरसागर,गणेश मिसाळ,रोषन देशमुख, रामचंद्र गायके आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती. यावेळी आंदोलकांनी केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात घोषणा दिल्या.

# रयत क्रांती संघटनेची जिल्हा आढावा बैठक

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**



परतुर तालुक्यामध्ये जिल्ह्याचे आढावा बैठक आयोजित करण्यात आली यावेळी रयत क्रांती संघटना राज्य कार्याध्यक्ष दीपक भोसले राज्य प्रवक्ते एन डी चौगुले सर जालना जिल्हाध्यक्ष गजानन भाऊ राजबिंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मार्केट कमिटी आढावा बैठक घेण्यात आली येणाऱ्या विधानसभा जिल्हा परिषद नगरपंचायत नगरपालिका या निवडणुकीच्या संदर्भात विचार करण्यात आले रयत क्रांती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष व राज्याचे माजी कृषी राज्यमंत्री आमदार सदाभाऊ साहेबांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रभर संघटना बांधणी चालू आहे येणाऱ्या विधानसभेला महायुतीचा घटक पक्ष म्हणून रयत क्रांती पक्षाच्या वतीने राज्यामध्ये १५ जागा लढवणार आहोत २५ ऑगस्टला पुणे येथे राज्य कार्यकारिणी घेण्यात आली यावेळी रयत क्रांती संघटनेच्या वतीने राज्यातील शेतकऱ्यांसाठी ठराव करण्यात आले ठराव क्रमांक एक रयत क्रांती संघटनेचा नारा सातबारा कोरा, सोयाबीनला प्रत्येक क्विंटल ७००० भाव मिळाला पाहिजे, कापसाला प्रत्येक क्विंटल १००० हजार रुपये मिळाला पाहिजे सन २०२४ २५ च्या ऊस गाळग हंगामासाठी प्रति टन ४००० हजार रुपये मिळाला पाहिजे तुरीला प्रति क्विंटल १५००० रुपये मिळाला पाहिजे असे अनेक मागण्यासाठी ठराव करण्यात आले लवकरच संपूर्ण महाराष्ट्र भर बांधणी करून करून पुढील काळामध्ये रयत क्रांती संघटनेच्या वतीने पुणे येथे महामेळावा घेण्यात येणार आहे यावेळी उपस्थित कार्यकर्ते अशोकराव बाहेकर,रवींचे कृष्णाकांत, नाईक सर, नागेश शिंदे,दीपक बोबडे, शंकर भांडवलकर,नामदेवराव मुंडे,राहुल बोबडे, धीरज रक्ताते,देविदास,वाघ, बालासाहेब शेजवळ, वरकड नाना,भारत काळे, गजानन शेंडगे शेतकरी उपस्थित होते


# परतुर नगर परिषद, परतुर

**प्रशासकीय इमारत बसस्टँड रोड, परतुर**

दिनांक : १/०९/२०२४ विभाग: पथविक्रेता निवडणुक २०२४ २०२४/जा.क्रं.६४६

## कार्यालय नगर परिषद परतुर

प्रसिध्दी दिनांक : २/०९/२०२४

**(उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनीयमन २०१४ च्या कलम ११ (४) १२ १३ अन्वये पात्र सदस्याची नावे मागविण्यात येत आहेत तसेच अधिसुचना नगर परिषदेच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | प्रवर्ग | सदस्य संख्या | अर्ज सादर करण्याची शेवटची दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशासकीय संघटना | ०१ | प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावा |
| २ | समुदाय अधारीत संघटना | ०१ | प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावा |
| ३ | निवासी कल्याण संघ | ०२ | प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावा |

वरील प्रमाणे सदस्य पदासाठी संबंधीत संघटनेच्या सदस्य जे खालील प्रमाणे पात्रता धारण करीत असतील त्यांनी नगर परिषदेत अर्ज सादर करावेत.
१) संघटनेच्या किंवा संघाची नियम ११ च्या उपनियम ४ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे क्षेत्रातील सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असावी.
२) संघटनाची किंवा संघ मागील ३ वर्षाचे सक्षम प्रधिकरणाकडून तयार करण्यात आलेले लेखापरीक्षा अहवाल सादर करील.
३) संघटना किंवा संघास स्थानिक प्राधिकरणाने काळ्या यादीत टाकलेले नसावे यासाठी १०० रू.स्टॅम्प पेपरवर नोटरी करून शपथपत्र सादर करावे.
४) संघटना किंवा संघ त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयाने सिध्द दोष असणार नाही.
५) संघटना किंवा संघ यांना त्यांनी सक्षम प्रधिकरणाकडे नोंदणी केल्याचे त्याच्या प्रवर्ग मधील कामाचा किमान पाच ५ वर्षाचा अनुभव असावा.
६) नगर परिषदेचा थकबाकीदार नसावा.

स्वाक्षरीत
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
नगर परिषद, परतुर ता.परतुर जि.जालना